POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०४ ● अंक-२४३ ● मुंबई, शनिवार, ५ एप्रिल २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## ८ तास वीज द्या, अन्यथा खुर्च्या खाली करा

### स्वाभिमानी शेतकरी संघटना आक्रमक, सोलापुरात अधिकाऱ्यांना धरले धारेवर

**■सोलापूर । प्रतिनिधी :**

सध्या एका बाजूला उन्हाचा चटका जाणवू लागला आहे, तर दुसऱ्या बाजूला वीजेची समस्या निर्माण होत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. शेतकऱ्यांना विविध संकटांना सामोर जावं लागत आहे. वीजेच्या समस्येमुळं सोलापूर जिल्ह्यातील माढा तालुक्यातील सीना नदीकाठावरील शेतकरी त्रस्त आहेत. कारण पाणी असून पिकांना पाणी देता येत नाही. कारणं अल्प विजपुरवठ्यामुळं मोठ्या संकटांचा सामना करावा लागत आहे. याच मुद्यावरुन स्वाभिमानी शेतकरी संघटना आक्रमक झाली आहे. थेट सोलापूरच्या जिल्ह्याधिकारी कार्यालयाच जाऊन स्वाभिमानीच्या कार्यकर्त्यांनी अधिकाऱ्यांना जाब विचारला. आट तास सुरळीत वीज पुरवठा करा, अन्यथा खुर्च्या खाली करा असा इशाराच स्वाभिमानीच्या कार्यकर्त्यांनी दिला आहे.

महाराष्ट्रातील सर्वात मोठ्या धरणांपैकी एक धरण म्हणजे सोलापूर जिल्ह्यातील माढा तालुक्यातील उजनी धरण आहे.



**स्वाभिमानीच्या कार्यकर्त्यांना अधिकाऱ्यांना धरले धारेवर**

दरम्यान, वीजेच्या आणि पाण्याच्या संदर्भात जाब विचारण्यासाठी माडा तालुक्यातील स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे २० ते २५ पदाधिकारी सोलापूरच्या जिल्ह्याधिकारी कार्यालयात गेले होते. यावेळी स्वाभिमानीच्या कार्यकर्त्यांना अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरल्याचा पाहायला मिळालं. शेतकऱ्यांच नुकसान करण्याचा विडा तुम्ही उचलला आहे का? असा सवाल करत शेतकरी आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाले. दरम्यान, यानंतर अधिकाऱ्यांनी आज झालेल्या पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या बैठकीत सीना भीमा जोडकालव्याचा विषय मांडला आहेय त्यानंतर सीना नदीकाळीठावरील वीजेच्या वेळेत वाढ करण्यात आली आहे. सध्या ४ तासाऐवजी ६ तास वीजपुरवठा करण्यात आला आहे. पुढच्या दोन ते तीन दिवसात वीजपुरवठा 8 तास होण्याची शक्यता आहे.

या झरणातून विविध ठिकाणी पाणी सोडण्यासाठी जोडकालवे, बोगदे तयार केले आहेत. या माध्यमातून पाणी सोडले जाते. यातीलच एक महत्वाचा कालवा म्हणजे भीमा सीना जोडकालवा. या कालव्याच्या माध्यमातून उजनीचं पाणी सीना नदीत सोडलं जातं. मात्र, सध्या सीना नदीकाठचा शेतकरी विजेच्या समस्येमुळं त्रस्त आहे. सोडलेलं पाणी सोलापूरपर्यंत पोहोचावं यासाठी कमी वेळ वीज दिली जात आहे. सुरुवातीला २ तास वीजपुरवठा केला जात होता. त्यानंतर ४ तास वीज पुरवठा केला होता. मात्र, यामध्येही देखील एअनेकदा वीजपुरवठा खंडीत केला जातो. त्यामुळं ४ तासातील प्रत्यक्ष शेतकऱ्याला मिळतात किती? हा खरा चिंतनाचा विषय आहे. यामुळेच माढा तालुक्यातील तांदळवाडीचे स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते आक्रमक झाले आहे. सोमवारपर्यंत म्हणजे ७ एप्रिलपर्यंत जर ८ तास वीजपुरवठा केला नाही तर सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करणार असल्याचा इशारा दिला आहे.

**स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या नेमक्या मागण्या काय?**

नदीवरील वीज पुराट खंडीत करण हा शेतकऱ्यांवर अन्याय आहे. ऐन उन्हळ्यात पिकाला पाण्याची गरज असताना वीज कपात केली जात आहे. यामुळं शेतकऱ्यांचे पिकांचे अतोनात नुकसान होत असल्याचे स्वाभिमानी शेतकरी संघटनेनं म्हटलं आहे. मुळात भीमा-सीना बोगद्याची निर्मिती ही माढा आणि मोहोळ तालुक्यांसाठी करण्यात आली आहे. तसेच या बोगद्याची कॅपेसिटी ही ९०० क्युसेक्स आहे. असे असतानाही कीही राजकीय पुढारी या पाण्याचे राजकारण करत आहेत. हे पाणी शेवटचा बंधारा कोसेर्गाव पर्यंत नेण्याचा राजकारण्यांचा डाव असल्याचे मत स्वाभिमानी शेतकरी संघटनेनं व्यक्त केलं आहे. तसेच धाराशिव जिल्ह्यातील सीना नदी काठावरील शिराळा नालगाव येथील कृषीपंपाचा तसेच बार्शी उपचा सिंचन सुरु आहे, मात्र, याकडे दुर्लक्ष केले जात आहे. त्यामुळं उजनीद धरणाच्या पाण्याचं योग्य नियोजन करावं, सलग पाणी सोडी नये, दोन पाळ्यांमध्ये १५ ते २० दिवसांचे अंतर असावे तरच ७ जूनप्यंत शेतीसाठी पाणी पुरेल अशी माहिती स्वाभिमानी शेतकरी संघटनेनं दिली आहे.

## 'माझ्या नादाला लागू नको, नागडा करीन मी'

### संजय राऊत यांची राष्ट्रवादीच्या 'या' नेत्याला वॉर्निंग

**■मुंबई । प्रतिनिधी :**

''दाऊदचा आरोप आम्ही नाही केला. देशाच्या पंतप्रधानांनी केला. कुछ लोग मिर्ची का व्यवहार करते है और कुछ लोग मिर्ची से व्यवहार करते है, हे भंडाऱ्यात कोण बोललं. कुठला मिर्ची? कुणाविषयी बोलले. ईडीची केस पाहा. नंतर भाजपमध्ये जाऊन बुट चाटून त्यांची चाटूगिरी करून आरोप धुण्याचा प्रयत्न केला. दाऊदशी व्यवहार, इक्बाल मिचीर्शी व्यवहार. मुंबईत १०० हून अधिक बॉम्बस्फोट केले अशा माणसाशी व्यवहार'', अशी टीका संजय राऊत यांनी केली.

''प्रफुल्ल पटेल दाऊदच्या पक्षातून जाऊन आले. दाऊदच्या पक्षातून भाजपमध्ये आले. भाजपमध्ये का आले तर आपली संपत्ती वाचवायला. तुरुंगात जाण्याची भीती असल्याने बचाव करण्यासाठी प्रफुल्ल पटेल दाऊदच्या सर्व संबंधासह भाजपात गेले. राष्ट्रवादाची आणि राष्ट्रीय सुरक्षेची भाषा करणाऱ्या अमित शाह यांनी त्यांना धुवून घेतलं. कारण ती वॉशिंग मशीन आहे. पटेल संसदेत आहे आम्हाला लाज वाटते हो. दाऊदचे हस्तक भाजपने संसदेत घेतले. ते दुसऱ्यांना निष्ठेच्या गोष्टी सांगतात, रंग बदलण्याच्या गोष्टी सांगतात. अजित पवार यांनी स्वतःचं अवमूल्यन करून घेतलंय'' अशी टीका अजित पवार यांनी केली.

''प्रफुल पटेलसारख्या माणसांना. पटेल हे दलाल आहेत. पटेलांसारखे लोकं कुणाचीच नाहीत हे दलाल आहेत. कधी काँग्रेसची दलाली करत होते, कधी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात शरद पवार यांना बाप बाप करत होते. कधी दाऊदची दलाली करत



होते आणि इथे आल्यावर मग त्यांची संपत्ती मोकळी झाली. हजार भर कोटीची. अशा लोकांची संसदेत उभं राहून बोलण्याची लायकी आहे का?'' अशी बोचरी टीका संजय राऊत यांनी केली.

**दाऊद इब्राहीमचा हिरवा रंग लागला**

''आम्ही कसले रंग बदलले. आम्ही बाळासाहेब ठाकरे यांच्या पक्षात आहोत. उद्धव ठाकरे यांच्या पक्षात आहोत. तुमचे रंग आधी पाहा. तुमचा रंग कोणता आहे. तुम्हाला दाऊद इब्राहीमचा हिरवा रंग लागला आहे. आणि तुम्ही वक्फवर बोलतात. मी प्रफुल्ल पटेलांना सांगतो माज्या नादाला लागू नको. नागडा करीन मी'', अशा शब्दात राऊतांनी प्रफुल पटेल यांना इशारा दिला. ''तिथे भाजपच्या लोकांना चमचेगिरी करून दाखवत होते. अशा घाण दळभद्र्याच्या तोंडाला लागणं हे शत्रू आहेत महाराष्ट्राचे. कशाला प्रफुल्ल पटेल भेटल्यावर नमस्कार करतो. जणू काय आकाशातून निष्ठेचा एक मूतीर्मंत पुतळा पडलोय, फार मोठा राष्ट्रभक्त आहे, अशा पद्धतीने'', अशी टीका राऊत यांनी केली.

**काय लेव्हल आहे का यांची फडणवीस यांच्या बाजूला बसायची**

"त्यांचा इतिहास काढायला लागलो सर्व तर त्यांना महाराष्ट्र सोडून जावं लागेल. ही लोकं फडणवीस यांच्या बाजूला जाऊन बसणार. काय लेव्हल आहे का यांची फडणवीस यांच्या बाजूला बसायची. हे वाकलेले लोकं आहेत. यांना पाठिचा कणा नाही. हे लोक महाराष्ट्राचं नेतृत्व संसदेत करतात. भाजपही या लोकांना खांद्यावर घेऊन बसतात. भाजपनेही स्वतःची लायकी काढली" अशी टीका संजय राऊत यांनी केली.

## मुंबई-पुणे एक्सप्रेसवेवर लोणावळ्यात सापडलं ५७ हजार किलो गोमांस... हैदराबाद कनेक्शन उघड

**■मुंबई । प्रतिनिधी :**

लोणावळा ग्रामीण पोलिसांनी मोठी कारवाई करत तब्बल ५७ टन गोमांस जप्त केले आहे. मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवर संशयास्पद वाटणारे दोन कंटेनर पोलिसांनी ताब्यात घेतले. या कारवाईत गोरक्षक संघटनांचाही सहभाग होता. तपासणी अहवालानंतर सदर मास गोमांस असल्याचे स्पष्ट झाले, त्यानंतर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

**एका गोरक्षकाने पोलिसांना फोनवरुन दिली माहिती**

मुंबई-पुणे एक्सप्रेस वे वरून दोन एसी कंटेनर संशयास्पदरित्या येत असून त्यामध्ये गोवंशीय मांस असल्याचा संशय पुण्यातील एका गोरक्षकाने लोणावळा ग्रामीण पोलिसांना संपर्क साधत व्यक्त केला होता. त्या माहितीच्या आधारे लोणावळा ग्रामीण पोलीस स्टेशनच्या हद्दीत मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवर दोन कंटेनर संशयास्पदरित्या आढळून आले. त्यामध्ये मोठ्या प्रमाणात जनावरांचे मांस असल्याची शक्यता व्यक्त करण्यात आली. स्थानिक गोरक्षक संघटनांनी तातडीने पोलिसांना माहिती दिली.



**हैदराबाद कनेक्शन समोर**

चालक नदीम कलीम अहमद आणि नसीर मोहंमद अहमद यांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहेत. ही वाहतूक मे. एशियन फूड्स मीन अँग्रो हैदराबाद या कंपनीच्या आदेशाने होत असल्याचे समोर आले आहे. कंपनीचे मालक मोहम्मद सादिक कुरेशी यांच्यासह इतरांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे राज्यभरात गोमांस तस्करीचा प्रश्न ऐरणीवर आला आहे आणि कायद्याच्या अंमलबजावणीसाठी अधिक सतर्कता बाळगण्याची गरज व्यक्त केली जात आहे. गोमांस बंदी कायद्याअंतर्गत कारवाई करण्याची आल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. या प्रकरणात दोघांना ताब्यात घेऊन चौकशी सुरु असून हे मांस कुठे नेलं जात होतं याचा शोध घेतला जात आहे.

त्यानंतर पोलिसांनी दोन्ही कंटेनर ताब्यात घेतले.

**म्हशीचे मांस असल्याचं सांगितलं पण...**

प्राथमिक टप्प्यात वाहतूकदारांनी ते म्हशीचे मांस असल्याचे सांगितले आणि आवश्यक कागदपत्रे दाखवली, मात्र गोरक्षक संघटनांनी यावर आक्षेप घेतला आणि मांसाच्या प्रयोगशाळा तपासणीची मागणी केली. पोलिसांनी दोन्ही कंटेनरमधील मांसाचे नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवले. प्राप्त झालेल्या अहवालानुसार, हे मांस गोवंशीय असल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर लोणावळा ग्रामीण पोलीस ठाण्यात संबंधितांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## पुढील २४ तासांत राज्याला पाऊस झोडपणार


**■मुंबई । प्रतिनिधी :**

एप्रिल महिन्यात सहसा उन्हाचा तडाखा वाढताना दिसतो मात्र यंदाचा एप्रिल महिना इथं अपवाद ठरत असून, या महिन्यात राज्यावर एकिकडून उष्णतेचा मारा होत असतानाच दुसरीकडे मात्र अवकाळी पावसानं थैमान पाहायला मिळत आहे. गेल्या ४८ तासांपासून राज्याच्या बहुतांश भागांमध्ये कमीजास्त प्रमाणात पावसानं हजेरी लावली असून पुढच्या २४ तासांमध्ये हे चित्र आणखी गंभीर होणार असल्याचा स्पष्ट इशारा हवामान विभागाच्या वतीनं देण्यात आला आहे.

केंद्रीय हवामानशास्त्र विभाग अर्थात आयएमडीनं राज्यात पुन्हा एकदा जोरदार पावसाचा

**मुंबईत मात्र होरपळ...**

राज्यात पावसाचा मारा सुरु असतानाच मुंबईची होरपळ काही कमी होत नाहीय. पुढील चार ते पाच दिवस मुंबईकरांची होरपळ सुरुच राहणार असून, मळभ काही प्रमाणात हटल्यानंतर नागरिकांना आता उन्हाच्या तडाख्यासोबत उकाड्याचाही फटका सोसावा लागत आहे. शहरातील किमान तापमानात नगण्य घट झाली असली तरीही त्यानं दिलासा मात्र मिळालेला नाही. त्यामुळं मुंबईकरांनी या वातावरणात आरोग्य जपावं असं आवाहन करण्यात येत आहे.



इशारा जारी केला आहे. नव्यानं तयार झालेल्या आणि अधिक तीव्रतेनं सक्रिय झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्यामुळे राज्यावर अवकाळीची वक्रदृष्टी पाहायला मिळत आहे. जिथंजिथं पावसानं हजेरी लावलीये राज्चयाच्या त्या भागांमध्ये तापमानाचा आकडा काही अंशांनी कमी झाला असून तो ३८ ते ३९ अंशांपर्यंत आला आहे. हवामान विभागाच्या इशाऱ्यानुसार राज्याच्या कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा, पूर्व विदर्भ या भागांना पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. सध्याच्या घडीला मराठवाड्यासह मध्य महाराष्ट्रावर चक्राकार वाऱ्यांची स्थिती असून मध्य प्रदेशच्या दक्षिणेपासून कर्नाटकपर्यंत कमी दाबाचा पट्टा सक्रिय असल्यानं या प्रणालीचा परिणाम म्हणजे महाराष्ट्रावर घोंगावणारं अवकाळी आणि गारपिटीचं सावट.

हवामान विभागाच्या इशाऱ्यानुसार राज्याच्या अनेक जिल्ह्यांमध्ये जोरदार पावसाची शक्यता असून दरम्यान गारपिटीचा माराही होणार आहे. या वादळी पावसादरम्यान वाऱ्याचा वेग ताशी ४० ते ४५ किमी इतका राहणार असल्यानं नागरिकांना सतर्क राहण्याचं आवाहन करण्यात आलं आहे. विजांच्या कडकडाटासह जोरदार पाऊस होणार असल्यानं नागरिकांनी हवामानाचा अंदाज घेत घराबाहेर पडावं असा स्पष्ट इशारासुद्धा यंत्रणांनी जारी केला आहे. हवामानाचा एकंदर इशारा पाहता पुणे, पिंपरी चिंचवड, छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, लातूर, धाराशिव, नांदेड, बीड, नाशिक इथं पावसाचा अलर्ट जारी करण्यात आला आहे.

**कुठे जात होते हे मजूर?**

मिळालेल्या माहितीनुसार, आलेगाव शिवारामध्ये ही दुर्घटना घडली. कामासाठी मजुरांना घेऊन जात असतानाच ट्रॅक्टर चालकाचं वाहनावरील नियंत्रण सुटलं आणि ट्रॅक्टर विहिरीत जाऊन कोसळला. या घटनेची माहिती मिळताच पोलीस आणि प्रशासकीय यंत्रणा घटनास्थळी दाखल झाली. प्राथमिक तपासात मिळालेल्या माहितीनुसार, आलेगावात राहणाऱ्या दगडोजी शिंदेंच्या शेतात कामासाठी हे सारे मजूर जात होते. सर्व मजूर हे हिंगोली जिल्ह्यातील वसमतमधील गुंज गावात राहणारे होते.

## ट्रॅक्टर विहिरीत पडून ६ जणांचा मृत्यू... बातमी वाऱ्याच्या वेगाने पसरली

**■नांदेड । प्रतिनिधी :**

नांदेडमध्ये एका विचित्र अपघातात ६ ते ७ मजुरांनी प्राण गमावल्याची माहिती समोर येत आहे. एक ट्रॅक्टर विहिरीत कोसळल्याने झालेल्या विचित्र अपघातामध्ये मजुरांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर येत आहे. या घटनेची माहिती समोर आल्यानंतर मदतकार्य सुरु करण्यात आलं आहे.

**तिघांना वाचवण्यात यश**

ज्या विहिरीमध्ये हा ट्रॅक्टर पडला त्यात बऱ्यापैकी पाणी असल्याने ट्रॅक्टर



विहिरीमध्ये पूर्णपणे बुडाला आहे. या ट्रॅक्टरचं केवळ एक चाक वरुन दिसत आहे. प्राथमिक माहितीप्रमाणे ट्रॅक्टरमध्ये १० जण होते. यापैकी तिघांना वाचवण्यात यश आलं असून ६ ते ७ मजुरांचा मृत्यू झाल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या ठिकाणी सध्या प्रशासनाकडून मदतकार्य राबवलं जात आहे.

मदत पोहोचण्याआधी गावकऱ्यांनाही या ट्रॅक्टर अपघातातून बचावलेल्यांना मदत करण्यासाठी विहिरीमध्ये दोरखंड सोडले होते. या अपघाताची बातमी गावात वाऱ्याच्या वेगाने पसरली आणि या ठिकाणी बघ्यांची मोठी गर्दी झाल्याचं पाहायला मिळत आहे. सध्या बचावकार्य सुरु आहे.

## मेव्हण्याचे नणंदेबरोबर अनैतिक संबंध... पत्नीच्या तक्रारीनंतर पतीने ट्रिमरने

**■सोलापूर । प्रतिनिधी :**

बार्शी शहरामध्ये अत्यंत विचित्र घटना घडली असून प्रकरण थेट पोलीस स्टेशनपर्यंत पोहोचलं आहे. शहरातील धर्माधिकारी प्लॉट येथे राहणाऱ्या एका विवाहिचा पती, नणंद आणि मेव्हण्याने वारंवार मानसिक व शारीरिक छळ केल्याची तक्रार दाखल करण्यात आली आहे. या महिलेचं तिच्याच सासरच्या तीन लोकांनी जबरदस्तीने मुंडण केल्याची तक्रार नोंदवण्यात आली आहे. या प्रकरणी विवाहितेने बार्शी पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून पोलिसांनी गुन्हा नोंदवून घेतला आहे.

**सगळं सुरळीत सुरु होतं पण...**

पीडित महिलेने दिलेल्या



माहितीनुसार, २०१६ साली तिचे लग्न झाले आहे. या महिलेचा तिच्या पतीसोबत संसार सुरळीत चालू होता. मात्र, काही महिन्यांपासून तिला नणंद व मेव्हण्याच्या वर्तणुकीत मोठा बदल दिसून येत होता. मेव्हण्याचे नणंदेबरोबर अनैतिक संबंध असल्याचे तिला समजले. ही बाब तिने पतीला सांगितल्यानंतर पतीने तिच्या आरोपांवर विश्वास ठेवण्याऐवजी तिच्यावरच संशय घेत शारीरिक व मानसिक छळ सुरू केला.

**गळा दाबला, केस ओढलं, भुवयांवरुन...**

८ मार्च रोजी रात्री आठच्या सुमारास पती, नणंद व मेव्हण्याने एकत्र येत पीडितेला बेदम मारहाण केल्याचा आरोप करण्यात आला आहे. मेव्हण्याने तिचा गळा दाबण्याचा प्रयत्न केला तर नणंदेने तिचे केस ओढल्याचं तक्रारीत म्हटलं आहे. पतीने या महिलेला लाथाबुक्यांनी मारत करत तिच्या चारित्र्यावर संशय घेतला. त्यानंतर रागाच्या भरात पतीने तिच्या भुवयांवरून ट्रिमर फिरवत चेहरा विद्रुप केला. जबरदस्तीने या महिलेला मुंडण करण्यास भाग पाडले.



**कुटुंबाला संपवण्याची धमकी**

याप्रकरणी त्रास असह्य झाल्याने विवाहितेने तिच्या बहिणीकडे धाव घेतली. पती व मेव्हण्याने या माहिलेवर अत्याचार केल्यानंतर तिला धमकावताना, 'घडलेल्या प्रकाराबद्दल कोणाकडे काही सांगितल्यास तुला व तुज्या कुटुंबीयांना ठार मारु', अशी धमकी दिली होती. या धमकीला घाबरुनच ही महिला आतापर्यंत गप्प बसली होती. मात्र, वारंवार होणारा हा त्रास असहाय्य झाल्याने तिने हिंमत दाखवत बार्शी पोलिस ठाण्यात धाव घेत तक्रार नोंदवली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पती, नणंद व मेव्हण्याविरोधात विविध कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

## अनैतिक संबंधांनी केला घात... पुण्याच्या हद्दीत दोन भयंकर हत्या

**■पुणे । प्रतिनिधी :**

गुन्हेगारी कृत्यांमध्ये दर दिवशी भर पडत असतानाच आता पुण्याच्या हद्दीतून दोन भयंकर हत्यांचं वृत्त समोर आल्यानं यंत्रणाही हादरल्या आहेत. अनैतिक संबंध ही हत्येमागची मुख्य कारणं ठरल्याची प्राथमिक माहिती तपासातून पोलिसांच्या हाती लागली असून, हादरवणारा घटनाक्रमही समोर आला आहे.

**सतीश वाघ हत्या प्रकरणाची पुनरावृत्ती...**

काही महिन्यांपूर्वी पुण्यात सतीश वाघ यांचं अपहरण करून त्यांची हत्या केल्याप्रकरणी त्यांची पत्नी आणि तिचा प्रियकर यांना अटक करण्यात आली होती. याच घटनेची पुनरावृत्ती पुण्यातील लोणी काळभोर परिसरातून झाली आहे. अनैतिक संबंधास अडसर ठरत असल्याने पत्नीने तिच्या प्रियकराच्या मदतीने पतीचा डोक्यात फावडा घालून खून केला. रवींद्र काशिनाथ काळभोर असं मृत्यू झालेल्या शेतकऱ्याचं नाव.

गुन्ह्याची माहिती मिळताच पोलिसांनी अवघ्या तीन तासात पत्नी शोभा रविंद्र काळभोर आणि तिचा प्रियकर गोरख त्र्यंबक काळभोर यांना अटक केली. मंगळवारी सकाळी रवींद्र काळभोर हे घराच्या बाहेरील पलंगावर रक्ताच्या थारोळ्यात पडून आल्याचे दिसून आले. पत्नीची चौकशी केली असता रवींद्र हे अनैतिक संबंधात अडसर होत असल्याने रवींद्र काळभोर यांचा कायमचा काटा काढल्याची बाब उघडकीस आली.

**अनैतिक संबंधातून झालेल्या वादातून २२ वर्षीय युवकाची हत्या**

पुण्याच्याच हद्दीत आणखी एक खळबळजनक घटना घडली. जिथं, अनैतिक संबंधातून झालेल्या वादातून २२ वर्षीय युवकाचा निर्घृण खून करण्यात आला. आरोपीने धारदार कोयत्याने युवकाच्या मानेवर वार करत त्याचा जीव घेतला. पुण्याच्या मावळ भागामध्ये या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून काही काळ भीतीचं वातावरण निर्माण झाल्याचं पाहायला मिळालं. खून झालेल्या तरुणाचं नाव वैभव उमेश सातकर असून, खून केल्याचा आरोप अंकुश जयवंत सातकर याच्यावर ठेवण्यात आला. मयत वैभव सातकर आणि आरोपी अंकुश सातकर हे दोघे शेजारी राहत होते. मयत वैभव सातकर याचे अनैतिक संबंध असल्याच्या संशयातून आरोपी अंकुश सातकरने त्याच्यावर बैलाच्या गोठ्यात धारदार कोयत्याने वार केले. या हल्ल्यात वैभव गंभीर जखमी झाला आणि त्याचा जागीच मृत्यू झाला. हत्येनंतर आरोपी अंधाराचा फायदा घेत घटनास्थळावरून फरार झाला. घटनेची माहिती मिळताच वडगाव पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. मृतदेहाचा पंचनामा करून तो ताब्यात घेण्यात आला. शवविच्छेदनासाठी मृतदेह प्राथमिक आरोग्य केंद्रात पाठवण्यात आला. या प्रकरणाचा पुढील तपास वडगाव मावळ पोलीस करत असून फरार आरोपीचा शोध घेतला जात आहे. या हत्याकांडामुळे संपूर्ण परिसरात दहशतीचं वातावरण पसरल्याचं पाहायला मिळालं.



संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# संशय नको, विश्वास हवा

**वक्फ मंडळ विधेयकावर संसदेत झालेली चर्चा ही राजकीय ध्रुवीकरण प्रतिबिंबित करणारी आहे. धोरणात्मक बाबींवर सत्ताधारी आणि विरोधक यांच्यातील दृष्टिकोनात फरक असणे, मतभेद असणे साहजिक; परंतु परस्परांवरील अविश्वास वाढणे चिंताजनक आहे.**

वक्फ मंडळाबाबतच्या सध्याच्या कायद्यात दुरुस्ती करणाऱ्या विधेयकाबाबत दोन्ही बाजूंत परस्परांबद्दलच्या अविश्वासाचे दर्शन झाले. या महत्त्वपूर्ण विधेयकावर अभ्यासपूर्ण चर्चा होण्याऐवजी आरोप-प्रत्यारोपांची चिखलफेक अधिक झाली. वक्फ मंडळे अधिक पारदर्शी करण्यासाठी, त्यांची कार्यक्षमता वाढविण्यासाठी आणि सर्वसामान्य मुस्लिमांचे हित साधण्यासाठी हे विधेयक आणल्याचा दावा केंद्रीय अल्पसंख्याक मंत्री किरण रिजिजू, गृहमंत्री अमित शहा यांच्याकडून केला गेला; तर विरोधी पक्षीयांनी या विधेयकाला देशविरोधी ठरविले. मुस्लिम समाजाला जाणीवपूर्वक लक्ष्य केले जात असल्याचा दावाही त्यांनी केला. वस्तुस्थिती दोहोंच्या मध्यभागी आहे. मात्र, आपल्या राजकारणासाठी दोन्ही बाजूंना ही वस्तुस्थिती जाणून घ्यायची नाही. मुस्लिमांच्या हिताची भाषा सरकारकडून होणे स्वागतार्ह आहे; परंतु या उक्तीला साजेशी अशी कृती सत्ताधारी पक्षाकडून व्हायला हवी. 'लव्ह जिहाद', 'बुलडोझर न्याय', 'बटेंगे तो कटेंगे' अशी भाषा निवडणुकांत वापरणाऱ्या पक्षाला सत्तेत आल्यानंतर मुस्लिमांच्या हिताची भाषा करताना तशा कृतीची जोड देणेही आवश्यक आहे. त्यासाठी मुस्लिमांचा विश्वास मिळवावा लागेल. ते होत नसल्याने वक्फ मंडळाच्या विधेयकाकडे भारतीय जनता पक्षाच्या हिंदुत्वाच्या राजकारणातून पाहिले जात आहे. विरोधकांकडून मुस्लिमांचे तुष्टीकरण होत असल्याच्या आरोपाच्या पलीकडे जाऊन सत्ताधाऱ्यांना याबाबत कृती करावी लागेल. कोणतेही नवीन विधेयक एक संधी निर्माण करीत असते. वक्फ मंडळाच्या विधेयकाने ती निर्माण केली आहे. वक्फ मंडळांच्या मालमत्तांबाबत पारदर्शकता वाढणे, ही मंडळे सर्वसमावेशक होणे गरजेचे आहे. त्यासाठी सरकारने विधेयकात केलेल्या दुरुस्तींवर किमान सहमती होणे महत्त्वाचे आहे. आपली मालमत्ता वक्फ मंडळाला दानरूपी देण्याचा अधिकार सध्या कोणालाही आहे. त्यामध्ये बदल करताना केवळ मुस्लिमांनाच हा अधिकार असल्याची दुरुस्ती करण्यात आली आहे. शिवाय संबंधित व्यक्तीने पाच वर्षे इस्लामचे आचरण केलेले असावे, असेही म्हटले आहे. वक्फ मंडळाला दान देण्याचा बिगर मुस्लिमांचा अधिकार काढून घेण्यामागची कारणमीमांसा करण्यात आलेली नाही. मात्र, यामागचा हेतू काही लपून राहिलेला नाही. वक्फ मंडळांमध्ये आणि परिषदेत बिगर मुस्लिमांना स्थान देण्यात आलेले आहे. मात्र, हा सरकारचा धर्मामधील हस्तक्षेप नसल्याचा दावा करण्यात आला आहे. राज्यघटनेच्या कलम २५ आणि २६ या कलमांचा भंग या दुरुस्तींमुळे होत नाही, हे नेमकेपणाने सांगणे गरजेचे होते. बोहरा आणि आगाखानी पंथांच्या मुस्लिमांनाही वक्फ मंडळांत प्रतिनिधित्व देण्याची तरतूद विधेयकात आहे. सध्या शिया आणि सुन्नी यांचे प्रतिनिधी तिथे असतात. नव्या तरतुदींमुळे मुस्लिमांत विभाजन करण्याचा सरकारचा डाव असल्याचा विरोधकांचा आरोप आहे. तो तसा नसल्याचे सांगताना त्याच्या समर्थनार्थ अधिक जोरकस मुद्दे सरकारने मांडणे आवश्यक होते. वक्फ लवादाचा निर्णय सध्या अंतिम आहे; परंतु आता उच्च न्यायालयात दाद मागण्याची सोय करण्यात आली आहे. त्यावर घेतल्या जात असलेल्या आक्षेपांचा परामर्श होणेही गरजेचे आहे. देशभरात सुमारे ८.७ लाख एकर मालमत्तांचे नियमन करणाऱ्या वक्फ मंडळांचा कारभार पारदर्शक व्हायलाच हवा. सुमारे एक लाख कोटी रुपयांहून अधिक मूल्य असलेल्या मालमत्तांचे व्यवस्थापन या मंडळांकडून होते. स्थावर मालमत्तेचा विषय असल्याने वाद-विवाद असणेही स्वाभाविक आहे. अशा स्थितीत मंडळांना कायद्यानुसार व्यवहार करणे, गैरव्यवहारांना स्थान न देणे महत्त्वाचे ठरते. मात्र, आर्थिक हितसंबंधीयांचे जाळे मोठे असल्याने गैरव्यवहारांचे आरोप होत आहेत. त्यामुळे वक्फ मंडळांच्या नियमन पद्धतीत बदल करणे आवश्यक ठरते. त्यासाठी कायद्यातील दुरुस्ती रास्त ठरते. मात्र, यामागे सरकारचा हेतू स्वच्छ असायला हवा. अल्पसंख्याक समाजाला असुरक्षित वाटू न देता, त्यांच्या धर्मात हस्तक्षेप होणार नाही, अशा पद्धतीने पावले टाकणे महत्त्वाचे ठरते. वक्फ मंडळ दुरुस्ती विधेयकावर होत असलेली टीका सरकारच्या हेतूंवर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारी आहे. दुरुस्ती विधेयकात सुधारणा कमी आणि अल्पसंख्याकांबाबत संशय अधिक असल्याचा आणि न्याय कमी आणि पक्षपात अधिक, असा आरोप होत आहे. या सर्व आरोपांचे निराकरण करून आपण खऱ्या अर्थाने मुस्लिमांचे हितैषी आहोत, हे सरकारला कृतीने दाखवावे लागेल. वक्फ मंडळ विधेयकाचे कायद्यात रूपांतर करताना याबाबतची संधी निर्माण झाली आहे. ती सरकारने साधायला हवी.

# मागा म्हणजे मिगेल?

**चार अमेरिकी उत्पादनांवर भारत आकारतो तितकाच कर भारतीय उत्पादनांवर अमेरिकेत आकारला जाईल ही ट्रम्प यांची भूमिका.**



कोणत्याही आर्थिक निकषावर भारत आणि अमेरिका यांच्यात बरोबरी होऊ शकत नाही. असे असले तरी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी २ एप्रिलपासून भारतीय उत्पादनांवर समान आयात कर आकारले जातील अशी घोषणा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अमेरिका भेटीत केली. वास्तविक दुसऱ्यांदा ट्रम्प अध्यक्षपदी विराजमान झाल्यानंतरची मोदी यांची ही पहिलीच अमेरिका भेट होती. ट्रम्प यांच्या दरबारात सादर झाले तेव्हा मोदी हे पहिले बड्या देशाचे प्रमुख होते. अशा वेळी एकमेकांची ख्यालीखुशाली विचारणे, शुभेच्छा देणे इतकेच अपेक्षित. पण तरीही ट्रम्प यांनी सर्व राजशिष्टाचार बाजूला ठेवून भारतावर समान आयात कर आकारणीची घोषणा केली. हा भारताचा दुसरा उपमर्द. त्याआधी भारतीय निर्वासितांस ट्रम्प प्रशासनाने हाती-पायी बेड्या घालून लष्करी विमानाने मायदेशी पाठवून आपला अपमान केलेला होताच. त्या वेळी खरे तर आपण अमेरिकेच्या या कृतीबाबत निषेध नोंदवला. पण तो तसा मिळमिळीतच. कारण मोदी अमेरिकेत असतानाही अमेरिकेने भारतीय निर्वासितांची तशीच पाठवणी सुरू ठेवली. त्यात ही समान कर आकारणीची एकतर्फी घोषणा. ती आता प्रत्यक्षात येईल असे दिसते. खरे तर मोदी आणि ट्रम्प यांच्यातील दोस्ताना आपल्याला वाचवेल या आशेवर भारतीय उद्योग जगत होते. पण तसे काही होईल अशी चिन्हे तूर्त नाहीत. शेवटच्या क्षणी ''आले ट्रम्पोजींच्या मना'' असे होऊन काही सवलती भारताच्या झोळीत घातल्या जाणारच नाहीत असे नाही. पण ती शक्यता धूसर दिसते. अशा वेळी ही आयात कर समानता प्रत्यक्षात आल्यास काय होईल याचा अंदाज घ्यायला हवा.

या मुदतीच्या पूर्वसंध्येस अमेरिकेने प्रसृत केलेल्या अहवालातून त्याची चुणूक दिसते. त्या देशाच्या व्यापार खात्याने 'द नॅशनल ट्रेड एस्टिमेट ऑन फॉरिन ट्रेड बॅरिअस' असा अहवाल प्रसिद्ध केला असून त्यात भारताकडून आकारल्या जाणाऱ्या आयात कराचा तपशील आहे. कृषी उत्पादने, मोटार आणि संबंधित उद्योग, औषधे आणि मद्य हे चार विषय अमेरिकेच्या रोषास कारणीभूत आहेत. म्हणजे या चार घटकांच्या अमेरिकेतील उत्पादनांवर भारतीय बाजारात फारच चढे कर आकारले जातात, ही अमेरिकेची तक्रार. यातील 'हार्ले डेव्हिडसन' या अतिश्रीमंत दुचाकींवर भारतात आकारल्या जाणाऱ्या करावर ट्रम्प यांनी याआधीही भाष्य केले होते. सुरुवातीस आपण त्याकडे दुर्लक्ष केले. पण मामला गंभीर आहे हे लक्षात आल्यावर त्यावरील करात कपात केली. पण ट्रम्प तेवढ्याने समाधानी झालेले दिसत नाहीत. त्यांना मोटार उद्योगाशी संबंधित सर्वच करात भारताने कपात करावी असे वाटते. दुसरा मुद्दा औषधांचा. आपण वास्तविक चीनखालोखाल सर्वात मोठे घाऊक औषधी रसायने उत्पादक आहोत. या औषधांचे संशोधनादी कार्य अमेरिकेत होते. त्याबरहुकूम रसायने आपण बनवतो. ती अमेरिकी कंपन्या खरेदी करतात. त्यांचे अंतिम औषधी उत्पादनात रूपांतर होऊन ती भारतीय बाजारात येतात तेव्हा त्यावर आकारले जाणारे आयात शुल्क अमेरिकेस मान्य नाही. शेतमालाची स्थानिक उत्पादने आकर्षक वाटावीत म्हणून आपण परदेशी आयात वस्तू/उत्पादनांवर आयात कर लावतो. त्याचा दर कमी केला जावा अशी ट्रम्प यांची मागणी आहे. तीच बाब परदेशी मद्याबाबत. हा मुद्दा इंग्लंडनेही उपस्थित केला असून भारत-इंग्लंड व्यापार करारातील तो एक मोठा अडथळा बनून राहिलेला आहे. याचे एक कारण त्या देशांतील मद्याचा दर्जा आणि भारतीय बाजारातील मागणीचा विस्तारता प्याला हे आहे. ती विलायती मद्यो व्यापक प्रमाणावर भारतीयांस साहजिकच परवडत नाहीत. त्याच वेळी 'भारतीय बनावटीची परदेशी मद्यो' अशी एक भ्रामक वर्गवारी आपण निर्माण केली आणि परदेशी बाजारात स्थिरावण्याचा प्रयत्न केला. तो अयशस्वी झाला. कारण मद्या मुरवण्याचे 'त्यांचे' नियम. ते आम्हास लागू करू नका असे आपले म्हणणे. कारण आपल्या देशात अधिक उष्मा असल्याने मद्या कमी काळात मुरते हा युक्तिवाद. तो अमेरिकादी देशांस मान्य नाही. त्यामुळे आपल्या मद्यावर तेथे निर्बंध येतात आणि आपण त्यांचे मद्या अधिकाधिक महाग कसे होईल हे पाहतो. ट्रम्प यांस हे मंजूर नाही.

त्यामुळे या चार घटकांतील अमेरिकी उत्पादनांवर भारत जितका कर आकारतो तितकाच कर भारतीय उत्पादनांवर अमेरिकेत आकारला जाईल ही त्यांची भूमिका. याचा अर्थ भारतीय उत्पादने अमेरिकी बाजारपेठेत अधिक महाग होऊन त्यांची मागणी कमी होईल. म्हणजेच या उत्पादनांच्या भारतीय उत्पादकांस त्याची झळ बसेल. परिणामी आधीच मंदावलेली आपली अर्थव्यवस्था अधिकच मंदावेल. हे टाळायचे असेल तर अमेरिकी उत्पादनांवरील आयात कर कमी करणे हा एकमेव उपाय आपल्यासमोर आहे. ट्रम्प यांची दांडगाई अशी की भारत हे आयात करांचे प्रमाण कमी करण्यास तयार आहे असे विधान त्यांनी परस्पर करूनही टाकले. ही कपात खरोखरच तशी होते आहे किंवा कसे ते आता कळेलच. पण असे करणे वाटते तितके सोपे नाही. याचे कारण अमेरिकी उत्पादनांवरील आयात कर ट्रम्प यांच्या इच्छेनुसार आपण खरोखरच कमी केले तर त्याचा परिणाम म्हणजे या क्षेत्रातील अमेरिकी उत्पादनांच्या भारतीय बाजारातील किमती कमी होतील आणि त्यांची मागणी वाढेल. त्याचा फटका स्थानिक उत्पादनांनाच आणि परिणामी आपल्या कारखानदारीस बसणार हे उघड आहे. ही 'इकडे आड तिकडे विहीर' अशी परिस्थिती. तीतून आपण कसा मार्ग काढणार हा प्रश्न.

पण तो तेवढाच नाही. अमेरिकेच्या या निवेदनात भारत सरकारच्या आणखी एका मुद्द्याबाबत त्या देशाने नाराजी नोंदवलेली आहे. तो मुद्दा म्हणजे सरकारकडून 'मधेच' केले जाणारे नियम बदल. उदाहरणार्थ ॲपल, ॲमेझॉन, फेसबुकादी कंपन्यांस त्यांच्या वापरकर्त्यांची माहिती साठवून ठेवणारे संगणक भारतातच असायला हवेत अशी घातलेली अट किंवा 'मास्टरकार्ड', 'व्हिसा' ही क्रेडिट कार्डे वापरणाऱ्या भारतीय ग्राहकांबाबतचा असाच आदेश, लॅपटॉप आयातीवर निर्बंध इत्यादी मुद्दे त्यात आहेत. ते रास्त नाहीत असे म्हणणे अवघड. खेळ सुरू केल्यानंतर मध्येच नियमांत बदल करण्याची ही आपली खोड खरे तर भारतीय उद्योगांसही खुपते. पण त्याबाबत तक्रार करण्याची हिंमत नसल्याने हे भारतीय उद्योग खाली मान घालून सर्व 'नियमाचार'सहन करतात. ही सहनशीलता अमेरिकी कंपन्यांनीही दाखवावी अशी अपेक्षा करणे अयोग्य. अध्यक्षपदी ट्रम्प आल्यानंतर तर ही बाब अगदीच अशक्यप्राय. तो देश आपल्या या सरकारी सवयीवर जाहीर नाराजी व्यक्त करण्याइतका पुढे गेला असून या मुद्द्यावरही माघार घेण्याखेरीज आपणास पर्याय नाही. त्याचमुळे लॅपटॉप आयातबंदीचा निर्णय मागे घेतला जाईल अशी चिन्हे आहेत. ही माघार कोणकोणत्या मुद्द्यांवर असेल याचा तपशील आता जाहीर होईल.

अमेरिकेत ट्रम्प यांच्या साक्षीने त्यांच्या 'मेक अमेरिका ग्रेट अगेन' ऊर्फ 'मागा' या घोषणेस आपल्या पंतप्रधानांनी 'मेक इंडिया ग्रेट अगेन' ऊर्फ 'मिगा' अशी साद दिली. ही शब्दकोटी उत्तम. पण 'मागा'समोर 'मिगा' टिकवणे हे खरे आव्हान. मराठीत 'मागा म्हणजे मिळेल' अशी म्हण आहे. तिचा आधार घेत सध्याच्या या कोट्यांच्या कुटिरोद्योगात सामील होत 'मागा म्हणजे मिगेल?' हा प्रश्न विचारणे अधिक सूचक.

# सावध दरवाढ



मालमत्ता खरेदीविक्रीसाठी लागू होणाऱ्या वार्षिक बाजारमूल्यामध्ये (रेडीरेकनर) मर्यादित वाढ करून राज्य सरकारने महसुलात वाढ करतानाच ग्राहकांवरही अधिक भार येऊ नये, याची काळजी घेतल्याचे दिसते. राज्यात सरासरी चार टक्के असलेली दरवाढ भौगोलिक विचार करता संमिश्र आहे. करोना काळापासून अर्थव्यवस्थेला आलेल्या सुस्तीचे परिणाम नंतरही जाणवत होते, सोबतच राज्यात निवडणुकांचे वारे वाहत होते. त्यामुळे गेल्या दोन वर्षांत या दरांत वाढ झाली नव्हती. आता पुढील निवडणुका दूर आहेत. त्या पार्श्वभूमीवर नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाने दहा ते पंधरा टक्के दरवाढीचा प्रस्ताव सरकारला सादर केला होता. त्यावर निर्णय घेताना कारभाऱ्यांना करावी लागलेली कसरत अंतिम दरांमधून स्पष्ट दिसते आहे. एकीकडे राज्यावरील कर्जाची फेड आणि 'लाडकी बहीण'सारख्या खर्चीक योजनांमुळे सरकारच्या तिजोरीवर मोठा भार पडत असून राज्यावरील कर्जफेडीसाठीही मोठा निधी खर्ची पडत आहे. अशा वेळी जवळपास ५८ हजार कोटी रुपयांचे उत्पन्न मिळवून देणाऱ्या मुद्रांक शुल्कात वाढ होणार, असाच अंदाज होता; मात्र रेडीरेकनरमध्ये वाढ झाली, तर त्याचा अंतिम भार हा सर्वसामान्य ग्राहकांवरच पडतो आणि घरखरेदीचे स्वप्न दूर जाते, असा अनुभव आहे. तसेच एकीकडे साऱ्या देशाचाच विकासदर मंदावत असून औद्योगिक-विशेषतः उत्पादन क्षेत्राला मरगळ येऊ पाहत असतानाच राज्याच्या आर्थिक विकासात मोठे योगदान देणाऱ्या आणि हजारो रोजगार निर्माण करणाऱ्या बांधकाम क्षेत्राच्या वाढीवर या दरवाढीचे विपरीत परिणाम होऊ नयेत, याची काळजी घेणेही सरकारला भाग आहे. त्यामुळेच ही वाढ मूळ प्रस्तावापेक्षा काही प्रमाणात सुसह्य ठरते.

# वंचित विद्यार्थ्यांना परदेशी शिक्षणासाठी सरकार शिष्यवृत्ती देते आणि सरकारी खाक्याही दाखवते...

**सरकारची शिष्यवृत्ती योजना विद्यार्थ्यांना संधी मिळवून देण्याऐवजी त्यांच्या वाटचालीवर मर्यादा आणते...**




ऐतिहासिकदृष्ट्या वंचित समुदायांतील विद्यार्थ्यांना परदेशात जागतिक दर्जाच्या शिक्षणाचा प्रवेश मिळावा यासाठी राष्ट्रीय परदेशी शिष्यवृत्ती योजना, म्हणजेच नॅशनल ओव्हरसीज स्कॉलरशीप स्कीम उर्फ नॉस (NOSS) ही एक परिवर्तनशील धोरण म्हणून योजण्यात आली होती. आर्थिक तसेच प्रस्थापित अडथळ्यांवर मात करून परदेशात शिक्षण घेणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संघषार्चे प्रतिबिंब असलेली ही योजना तत्त्वतः सामाजिक न्यायाचा वारसा पुढे नेते. परंतु, आज अनेक विद्यार्थ्यांच्या अनुभवांवरून वेगळेच वास्तव पुढे येते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना कॉलंबिया विद्यापीठ, यूएसए आणि युनायटेड किंगडमलंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समध्ये जाण्यासाठी शिष्यवृत्ती मिळाली नसती, तर 'रुपयाचा प्रश्न' हा ग्रंथ लिहिणारे विद्वान डॉ. आंबेडकर आपल्याला दिसले असते का? आधुनिक भारताचा संविधानिक पाया रचणारा त्यांच्यातील नेता आपण पाहिला असता का या प्रश्नांची उत्तरे देणे कठीण, पण यामुळे वंचित समुदायांसाठी उच्च शिक्षणाच्या प्रवेशाचे महत्त्व अधोरेखित होते. आज, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि अन्य दबलेल्या गटांतील अनेक महत्त्वाकांक्षी विद्यार्थ्यांना भारतात तसेच परदेशात उच्च शिक्षण हा सामाजिक प्रगतीचा मार्ग वाटतो. मात्र, त्यांना सक्षम करण्याऐवजी, नॉससारख्या शिष्यवृत्ती योजना कृत्रिम अडथळे निर्माण करत आहेत, संधी वाढवण्याऐवजी मर्यादित करत आहेत.

ही शिष्यवृत्ती अन्य राज्यस्तरीय शिष्यवृत्तींसाठी एक उदाहरण म्हणून पाहिली जाते, त्यामुळे नॉसमध्ये सुधारणा करणे हे आज अधिक गरजेचे आणि महत्त्वाचे आहे. या लेखात, मी या शिष्यवृत्ती कार्यक्रमातील विरोधाभासांचे विश्लेषण केले आहे. प्रशासकीय त्रुटी आणि धोरणात्मक उणिवा ज्या विद्यार्थ्यांना मदत करायची आहे त्यांचीच कशी अडवणूक करतात ते उघड केले आहे.

**धोरणात्मक उद्दिष्टांमधील विरोधाभास :**

नॉसचा सर्वात विवादास्पद पैलू म्हणजे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांनी त्वरित भारतात परत येण्याची सक्ती. या शिष्यवृत्तीचा उद्देश लाभार्थ्यांची ''आर्थिक आणि सामाजिक उन्नती'' करणे असा सांगितला जात, असला तरी संशोधन दर्शवते की आंतरराष्ट्रीय शिक्षणाचे वास्तविक कौशल्य आणि सुधारित करिअर संधींमध्ये रूपांतर करण्यासाठी परदेशातील व्यावहारिक कामाचा अनुभव, जसे की इंटर्नशिप किंवा अल्पकालीन रोजगार, अत्यंत महत्त्वाचा असतो. उदाहरणार्थ, परदेशात शिक्षण घेण्यासाठी प्रसिद्ध असलेल्या युनायटेड किंगडम, युनायटेड स्टेट्स, आणि ऑस्ट्रेलियासारख्या देशांमध्ये पदवी पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांना संबंधित नोकरीचा अनुभव मिळावा यासाठी पोस्ट-स्टडी वर्क व्हिसा उपलब्ध असतो. त्वरित परत येण्याची सक्ती करून, नॉस केवळ शैक्षणिक आणि नोकरीच्या संधींवर मर्यादा घालत नाही तर विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय शिक्षणाचा संपूर्ण लाभ घेण्यातही अडथळा आणते. या धोरणावर अभ्यासकांनी टीका केली आहे कारण ते यातून या कार्यक्रमाच्या दीर्घकालीन फायद्यांवर मर्यादित येते आणि शिक्षणातून आर्थिक गतिशीलता निर्माण करण्यास अपयशी ठरते.

**अपुरे आर्थिक सहाय्य :**

नॉसशिष्यवृत्तीच्यावित्तपुरवठ्यातून त्याच्या आश्वासनांमध्ये आणि विद्यार्थ्यांना भोगाव्या लागणाऱ्या प्रत्यक्ष परिस्थितींमध्ये मोठी तफावत असल्याचे दिसते. उदाहरणार्थ, आंतरराष्ट्रीय शिष्यवृत्त्या जसे की Chevening आणि Commonwealth यांची रक्कम दरवर्षी महागाई आणि स्थानिक राहणीमान खर्चाच्या आधारावर सुधारली जाते, तर नॉस मात्र सुरुवातीपासूनच निश्चित रक्कम प्रदान करत असून ती वाढत्या परदेशी खचार्नुसार समायोजित केलेली नाही. अनेक विद्यार्थी सांगतात की अमेरिकेतील शिक्षणासाठी सुमारे मिळणारा १५,४०० डॉलर्स आणि इंग्लंडसाठी मिळणारा ९,९०० युरो हा निर्वाह भत्ता अत्यंत अपुरा आहे. काही प्रकरणांमध्ये, लाभार्थ्यांना गरजेच्या खर्चाची पूर्तता करण्यासाठी अर्धवेळ नोकरी करावी लागते. उदाहरणार्थ, सुरेश (नाव बदललेले) याने नॉसद्वारे लंडनमधील एका प्रमुख विद्यापीठातून मास्टर्स करण्यासाठी प्रवेश घेतला, परंतु त्याला राहणीमान आणि वैयक्तिक खर्च भागवण्यासाठी रेस्टॉरंटमध्ये काम करावे लागले, ज्यामुळे त्याला शैक्षणिक व्यत्यय आणि मानसिक तणावाचा सामना करावा लागला. या अपुऱ्या आर्थिक पाठिंब्यातून फक्त या कार्यक्रमाच्या हेतूची परिणामकारकता कमी होत नाही तर आधीच असुरक्षित असलेल्या विद्यार्थ्यांवर अतिरिक्त आर्थिक ओझे पडते.

**प्रतिबंधात्मक शैक्षणिक अटी आणि संवादातील अपयश**

नॉससंदर्भात आणखी एक मोठी टीका म्हणजे शैक्षणिक संशोधनासंबंधी लादलेली बंधने. अलीकडील शिष्यवृत्ती मार्गदर्शक सूचनांमध्ये स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे की लाभार्थी विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृती, वारसा, इतिहास आणि सामाजिक अभ्यास यासंबंधी संशोधन करता येणार नाही. अनेक गैर-भारतीय संशोधकांनी या क्षेत्रात उत्कृष्ट कार्य केले आहे, कदाचित भारतीय अभ्यासकांपेक्षा अधिक, तरीसुद्धा लाभार्थींना भारतीय संस्कृती, वारसा, इतिहास आणि सामाजिक अभ्यास यासंदर्भातील संशोधन करण्यास मज्जाव करणे आकलनाच्या पलीकडचे आहे! अशा अटी शैक्षणिक संशोधनाच्या संधींना मोठ्या प्रमाणावर मर्यादा घालतात आणि परिणामी, या विद्यार्थ्यांना त्यांच्या समाजावर परिणाम करणाऱ्या महत्त्वाच्या मुद्द्यांवर सखोल अंतर्दृष्टी निर्माण करण्यापासून रोखतात. यामुळे ही धोरणे केवळ शैक्षणिक स्वातंत्र्यावर मर्यादा आणत नाहीत तर सामाजिक प्रगतीसाठी आवश्यक असलेल्या, या धोरणाने द्यायला हव्या होत्या, अशा संधींवरही निर्बंध आणतात. याशिवाय, नॉसच्या प्रशासकीय व्यवस्थेमध्ये संवादाचा मोठा अभाव दिसून येतो. अनेक विद्यार्थ्यांच्या अनुभवांवरून समजते कीकोणत्याही माहितीसाठी किंवा मदतीसाठी संपर्क केला, तर त्यांना प्रतिसाद मिळत नाही. विद्यार्थी वारंवार सांगतात की त्यांना प्रशासकीय अडथळे आणि बेजबाबदार प्रणालींमधून मार्ग काढावा लागतो. ही परिस्थिती परदेशात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अधिक अडचणी निर्माण करते. स्कॉटलंडमधील एका प्रमुख विद्यापीठात प्रवेश मिळवलेल्या एका विद्यार्थ्याने मार्मिकपणे सांगितले, ''त्यांच्याशी संपर्क साधण्याचा काहीच मार्ग नाही... आम्हाला नेहमीच गप्प राहावे लागत होते, किंवा कदाचित आम्हाला पद्धतशीररित्या तसे करायला भाग पाडले गेले.''

**निधीचा अपुरा वापर**

'द प्रिंट' मध्ये प्रसिद्ध झालेल्या एका वृत्तानुसार, २०१७-१८ ते २०२०-२१ या कालावधीत अनुसूचित जातींसाठीच्या कल्याणकारी योजनांसाठी जवळपास २.६ लाख कोटी रुपये मंजूर करण्यात आले, त्यापैकी ४९,७२२.१८ कोटी रुपये वेगवेगळ्या मंत्रालयांकडून वापरले न गेल्याने परत करण्यात आले. एवढा मोठा निधी सामाजिक कल्याणासाठी उपलब्ध असतानाही, नॉसच्या अपुऱ्या आर्थिक सहाय्यामागचे कारण निधीची कमतरता नसून, तीव्र इच्छाशक्तीचा अभाव असल्याचे दिसते. ही विसंगती हे सूचित करते की प्रत्यक्षात वंचित विद्यार्थ्यांसाठी संधी निर्माण करण्याऐवजी, हा निधी केवळ एक दिखाऊ व्यवस्था म्हणून वापरला जात आहे, तर वास्तविकता मात्र वेगळीच आहे.

**शिक्षणाला मर्यादा घालणारे नियम**

नॉसच्या सर्वात प्रतिबंधात्मक आणि प्रतिकूल अटींपैकी एक म्हणजे परदेशी विद्यापीठातून आधीच पदवी मिळवलेल्या विद्यार्थ्यांना या योजनेसाठी अपात्र ठरवणे. एकदा परदेशी शिक्षण घेतल्यानंतर तो विद्यार्थी सामाजिक आणि व्यावसायिक प्रगतीसाठी सक्षम होतो. अशा चुकीच्या गृहितकावर हे आधारित आहे. मात्र, हे वास्तवाच्या पूर्णतः विपरीत आहे. उच्च शिक्षण विशेषतः प्रतिष्ठित संस्थांमध्ये विशेषज्ञता आणि पुढील संशोधनावर आधारित अशा चरणबद्ध संरचनेत असते. अनेक प्रतिष्ठित विद्वानांकडे एकापेक्षा अधिक पदवी असतात,त्यामुळे त्यांना त्यांच्या क्षेत्रात सखोल योगदान देता येते. मात्र, नॉस वंचित गटांतील विद्यार्थ्यांसाठी हा मार्ग बंद करून जणू त्यांच्या शैक्षणिक प्रवासाला एक मयार्दा घालते. ही मयार्दा विशेषतः कायदा, अर्थशास्त्र, सार्वजनिक धोरण आणि विज्ञान यासारख्या क्षेत्रांसाठी हानिकारक ठरते, कारण या क्षेत्रांमध्ये प्रगत संशोधन अनिवार्य असते. या निर्बंधांमुळे केवळ शैक्षणिक संधी मर्यादित होत नाहीत, तर सामाजिक न्याय आणि राष्ट्र उभारणीवरही विपरीत परिणाम होतो. एकदा विद्यार्थ्याने परदेशी पदवी मिळवली की लगेच येऊन परत त्याने येऊन देशसेवा करावी, असे हे धोरण सांगते परंतु, ''देशाला योगदान देणे'' महत्त्वाचे असले तरी, खरे सशक्तीकरण तेव्हाच घडते जेव्हा विद्वानांना जागतिक स्तरावर स्पर्धा करण्यास योग्य संधी आणि साधने दिली जातात. नॉसच्या निर्बंधांमुळे वंचित समुदायातील विद्वान आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठेच्या शैक्षणिक व्यवस्थेत काही काळ प्रवेश तर मिळवतात, पण त्यात स्थिर होऊन पुढे जाण्याच्या त्यांच्या संधींवर मयार्दा येतात.

**व्यापक गरजेच्या सुधारणा**

नॉसमध्ये सध्या अनेक धोरणात्मक विसंगती आहेत. त्याचा नॉसच्या मूळ उद्दिष्टांवर विपरीत परिणाम होतो आहे. सक्तीची परताव्याची अट, अपुरी आर्थिक मदत, संशोधनावर घातलेले निर्बंध, आणि प्रशासनातील संवादाचा अभाव हे सर्व घटक मिळून वंचित विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय शिक्षणाच्या संधींचा पूर्ण वापर करण्यापासून रोखतात.

**योजनेच्या उद्देशाला पूर्णपणे न्याय देण्यासाठी तिच्या धोरणांमध्ये मूलभूत बदल करणे आवश्यक आहे. यात पुढील सुधारणा समाविष्ट असाव्यात–**

- सक्तीची परताव्याची अट शिथिल करून विद्यार्थ्यांना परदेशात काही काळ अनुभव घेण्याची संधी द्यावी.
- शिष्यवृत्तीचा भत्ता महागाईदर आणि आंतरराष्ट्रीय जीवनशैलीच्या खर्चानुसार पुनरावलोकित करावा.
- संशोधन विषयांवरील अनावश्यक निर्बंध हटवावेत आणि विद्यार्थ्यांच्या ज्ञानाच्या क्षेत्राचा विस्तार करण्यास मदत करावी.
- ज्यांचे आधीच परदेशात शिक्षण झाले आहे, पण झालेल्या शिक्षणावरच्या उच्च शिक्षणासाठी परदेशात जाऊ इच्छितात, त्यांना अपात्र ठरवू नये.

शिष्यवृत्तीच्या धोरणांना लाभार्थी विद्यार्थ्यांच्या वास्तव गरजांशी समरूप केल्याशिवाय, नॉस खऱ्या अर्थाने सशक्तीकरणाचे साधन बनू शकणार नाही. या धोरणांमध्ये तातडीने सुधारणा केली गेली नाही, तर ही योजना सामाजिक परिवर्तन आणि न्यायासाठी नव्हे, तर केवळ मर्यादित संधी प्रदान करणाऱ्या यंत्रणेसारखीच राहील. लेखक चंद्रपूर येथील ध्येय एज्युकेशनल फाऊंडेशनचे संस्थापक आहेत. त्यांनी युनिव्हर्सिटी ऑफ एडिनबर्ग, स्कॉटलंड येथून डेटा, विषमता आणि समाज विषयात पदव्युत्तर शिक्षण घेतले आहे. त्यांचे संशोधन मेरिटोक्रसी, आरक्षण धोरणे आणि वंचित विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणातील अनुभवांवर केंद्रित आहे. ते सामाजिक न्याय आणि शैक्षणिक समानतेसाठी कार्यरत आहेत.



## कैरी-दुधीचा मुरांबा

**साहित्य:** दुधी भोपळ्याचा कीस ३ वाट्या, कैरीचा कीस १/२ वाटी, साखर ३-१/२ वाट्या, वेलची पूड २ चमचे, केशरकाड्या १/२ चमचा.


**कृती:** प्रथम दुधी भोपळा व कैरी वेगवेगळे किसून घेऊन नंतर एकत्र करणे व त्यात साखर घालून १० मिनिटे तसेच ठेवणे, साखर हळूहळू विरघळू लागेल नंतर गॅसवर ठेवून उकळणे. साधारण एकतारी झाला असे वाटले की गॅस बंद करून त्यात केशर व वेलची पूड एकत्र करून थंड झाल्यावर बाटलीत भरणे. पारदर्शक असा हा मुरांबा दुधी भोपळा प्रकृतीने थंड असल्यामुळे उन्हाळ्यात अतिशय उत्तम.

# हेअर कलर करा पण सांभाळून...

आजकाल मुली असो वा स्त्रिया हेअर कलर करण्याचं क्रेझ वाढलं आहे. सध्या लेटेस्ट रंग वापरून आपल्या पर्सनालिटीला एक वेगळा लुक देता येतो. अलीकडे ब्राऊन, चॉकलेट, बरगंडी आणि ब्लैंड फॅशनमध्ये आहे. त्यातून हायलायटिंगचा ट्रेंड आहे. मात्र केसांना कलर देण्यापूर्वी त्यांचा प्रकार समजून घेणं गरजेचं आहे.

### कलर करण्यापूर्वी हे करा

- कलर करण्यापूर्वी हेअर कटिंग किंवा ट्रिमिंग करून घ्या.
- कलरिंगसाठी दिलेल्या निदेर्शांक पुस्तिकेत सांगितल्याप्रमाणे हेअर कलर करण्यापूर्वी ऍलर्जी टेस्ट करून घ्या.
- कलर वापरण्यापूर्वी दिलेल्या सूचना नीट वाचून घ्या.
- आपल्या केसांवर पूर्वी कधीच रंगांचा वापर केलेला नाही की ते आधीपासूनच रंगलेले आहेत. जे जाणून घेतल्यानंतर योग्य रंगाची निवड करा.
- कलर निवडण्यापूर्वी काही शंका असेल तर हेअर एक्सपर्टचा सल्ला घ्या.
- कलर करण्यापूर्वी एकाच आकाराचे फॉइल तयार ठेवा.
- अता व्ही शेपमध्ये केस घेऊन त्याचे पातळ सेक्शन करून घ्या. त्याखाली फॉइल ठेवून केसांना कलर करा आणि दोन्ही बाजूने दुमडून फोल्ड करा. हायलाइट एकासारखं असावं हे लक्षात असू द्या.
- कलर झाल्यावर अर्ध्या तासाने फॉइल काढा आणि केस धुऊन शेपू करा. केस वाळल्यावर वेगळाच लुक येईल.





### हे करू नका

- कलर करताना केसांच्या मुळांना कलर लावू नका.
- वयाने जास्त असलेल्या स्त्रियांनी डार्क रंगाचा वापर करू नये.
- ओल्या केसांमध्ये कलर करू नये याने कलर स्कल्पवर पसरतो.
- कलर केलेले केस कधीच गरम पाण्याने धुऊ नये. याने कलर फिकट होऊ लागतो.
- दुर्सयांचं पाहून रंगाची निवड करू नये. आपल्याला जो शोभेल तोच कलर वापरा.

# चॉकलेट खाण्याचे हे आहेत फायदे

चॉकलेट कोणाला आवडत नाही? लहानापांसून थोरामोठ्यांपर्यंत चॉकलेट आवडीने खातात. मात्र दातांवर परिणाम होऊ नये यासाठी काहीजण चॉकलेट खात नाहीत. मात्र तुम्हाला माहीत आहे का चॉकलेट खाण्याचेही अनेक आश्चर्यकारक फायदेही आहेत.

**तणाव कमी करण्यासाठी फायदेशीर**

– तणाव कमी करण्यासाठी चॉकलेट अधिक फायदेशीर आहे. डार्क चॉकलेट खाण्याने तणाव कमी होतो. उच्च रक्तदाबाचा त्रास कमी करण्यासाठी चॉकलेटचे सेवन परिणामकारक ठरते. कोकोमध्ये असलेले अँटीऑक्सिडंटस स्वास्थ चांगले राखण्यासाठी मदतशीर ठरतात. हृदयासाठीही चॉकलेट फायदेशीर आहे. चॉकलेटच्या सेवनाने हृदयरोगाची शक्यता कमी होते. चॉकलेट खाण्याने व्यक्तीचा मूड सुधारतो. कोकोच्या सेवनाने थकवा कमी होण्यास मदत होते.

**वजन घटवण्यात गुणकारी**

– ॅलिफोर्नियाच्या सॅन डिगो विद्यापीठात करण्यात आलेल्या संशोधनानुसार नियमितपणे चॉकलेट खाल्ल्याने वजन कमी होण्यात मदत होते. वैज्ञानिकांनुसार चॉकलेटमधील कोको फ्लॅवनॉल वाढत्या वयासंबंधित आजारांना दूर ठेवते. अमेरिकेच्या संशोधनानुसार, रोज हॉट चॉकलेटचे दोन कप सेवन केल्यास मानसिक स्वास्थ्य चांगले राहते. तसेच स्मरणशक्तीही वाढते.



# प्रेग्नन्सी दरम्यान कारल्याचे सेवन करावे की करु नये, दूर करा कन्फ्यूजन

गर्भावस्थेत स्त्रिया आपल्या खाण्यापिण्याबद्दल फारच कॉन्शियस होऊन जातात. काय खायला पाहिजे काय नाही, या बद्दल बर्याच गर्भवती स्त्रियांना योग्य माहिती नसते. बर्याच महिला गर्भावस्थेत कारले खायला पाहिजे की नाही याबद्दल भ्रमित असतात. तर त्यांचे कंफ्यूजन आपण दूर करू. गर्भावस्थेदरम्यान कारल्याचे सेवन आई आणि बाळ दोघांच्या आरोग्यासाठी एक उत्तम विकल्प साबीत होऊ शकते. कारल्यात फायबर, कॅल्शियम, पोटॅशियम, बीटा-केरोटिन आणि आयट्री फायबर असत जे गर्भात वाढणारे बाळ आणि आई दोघांच्या आरोग्यासाठी फायदेशीर असत.



**फायबरचे प्रमाण जास्त असतात :** कारल्यात फायबर उच्च मात्रेत असत ज्यामुळे भूक लवकर लागत नाही. हे हाय कॅलोरी फूड्स आणि जंक फूड्सच्या क्रेविंग्सला कमी करतो. त्याशिवाय हे प्रेग्नेंसीदरम्यान तुम्हाला लठ्ठ होण्यापासून देखील तुमचा बचाव करतो.

**टीऑक्सीडेंट असतो :** कारल्यात व्हिटॅमिन सी असत, जे एंटीऑक्सीडेंट असून गर्भवती महिलांना हानिकारक बॅक्टेरियापासून लढण्याची शक्ती देत. हे गर्भवती महिलांच्या रोगप्रतिकारकला देखील वाढवण्यास मदत करतो आणि रोगप्रतिकारक सिस्टमला बूस्ट करतो.


**बॉवेल मुव्हमेंटला योग्य ठेवतो :** कारले पेरिस्टालिसिसला बूस्ट देण्यास देखील मदत करतो जे नंतर बॉवेल हालचालला नियंत्रित करणे आणि गर्भवती महिलांच्या पचन तंत्राला योग्य करण्यात मदत करतो. कारले पचन तंत्राशी निगडित इतर समस्यांमध्ये देखील आराम देण्यास मदत करतो.

**फोलेट उच्च प्रमाणात असतो :** गर्भवती महिलांसाठी फोलेटची आवश्यकता असते. हे मिनरल्स संभावित न्यूरल ट्यूब डिफेक्टला सुरक्षित ठेवण्यास मदत करतो. कारल्यात फोलेटची मात्रा फार जास्त असते. यामुळे गर्भवती महिलांमध्ये या मिनरल्सच्या दैनिक आवश्यकतेचे एक चतुर्थांश भाग आहे.

**अभ्रकाचा विकास करतो :** कारल्यात काही खास प्रकारचे व्हिटॅमिन्स आणि मिनिरल्सचा एक मोठा स्त्रोत असतो. यात आयरन, नियासिन, पोटॅशियम, पेंटोथेनिक ऍसिड, जिंक, पाइरोडॉक्सिन, मॅग्नीशियम आणि मँगनीज सामील आहे. याला म्हणून आपण सुपर भाजी म्हणू शकतो कारण हे भ्रूणच्या विकासात एक महत्त्वाची भूमिका बजावतो.

# फोन 'स्वस्त' पण फोटो येतील 'मस्त', फक्त 'या' सोप्या टीप्स करा फॉलो !

तुमच्याकडे कोणत्याही प्रकारचा स्मार्टफोन असेल भलेही स्वस्त किंमतीचाही असेल पण तरीही जर तुम्हाला फोटोग्राफीच्या खास ट्रीक्स माहित असतील तर तुमच्या फोनमधील फोटो अगदी बेस्टच येतील. आजकाल डिजीटल कॅमेरा फार कमी लोक वापरतात. प्रोफेशनल लोक सोडले तर इतर सर्वजण मोबाईल फोनच्या कॅमेऱ्यानेच सर्व फोटोग्राफी करतात. पूर्वी घरातील फंक्शन्स किंवा पिकनिकला कॅमेरा वापरला जायचा पण आजकाल सर्वत्र मोबाईल फोनच्या कॅमेऱ्यानेच काम होतं, पण त्यामुळे फोनमधून फोटोही तसेच यावे असं वाटत असतं. पण अनेकांकडे बजेटच्या इश्यूमुळे स्वस्तातले फोन असतात, त्यांना वाटतं की फोन स्वस्त असल्यामुळे फोटो चांगले येणार नाहीत. पण मूळात तुमच्याकडे १०-२० हजारांचा फोन असेल तरी तुम्ही भारी फोटो काढू शकता, त्यासाठी सोप्या काही टीप्स तुम्हाला फॉलो कराव्या लागतील... त्याच टीप्सबद्दल जाणून घेऊ...



फ्रेमः तुम्ही कोणत्याही वस्तूचा किंवा व्यक्तीचा फोटो घेत असाल तर तो पूर्णपणे फ्रेममध्ये ठेवा. म्हणजेच, वस्तू फ्रेममध्ये योग्यरित्या आली पाहिजे, कॅमेरा ते ऑब्जेक्टपर्यंतचं अंतरही नेमकं हवं. प्रकाशः चांगला फोटो काढण्यासाठी तुम्हाला योग्य लाईट म्हणजेच प्रकाशाची काळजी घेणंही आवश्यक आहे. योग्य लाईट नसेल तर फोटो डार्क येऊ शकतो,तसंच अतिप्रकाशातही फोटो बरोबर येणार नाही योग्य लाईट फार महत्त्वाची असते.

दोन्ही हातांचा करा वापरः चांगला फोटो काढण्यासाठी नेहमी दोन हात वापरा जेणेकरून तुमची फोनवरील पकड चांगली होईल आणि तुम्ही ऑब्जेक्ट आरामात कॅप्चर करू शकता.

झूमः फोटो घेण्यासाठी झूम या फीचरचा जपून वापर करा. आवश्यक असल्यासच कॅमेरा झूम करा किंवा फिजीकली तुम्ही फोटो काढणाऱ्या व्यक्ती किंवा गोष्टीच्या जवळ जा, ज्यामुळे फोटो फाटणार नाही.

तसेच स्मार्टफोनमध्ये उपलब्ध असलेले वेगवेगळे मोड वापरुनही तुम्ही आपोआप फोटो अधिक चांगले काढू शकता. आजकाल मोबाईल फोनमध्ये पोर्ट्रेट, नाईट, प्रो आणि स्लो-मो असे अनेक पर्याय आहेत, ज्याच्या मदतीने तुम्ही चांगले फोटो काढू शकता.

# जवस रोजच्या जीवनात फायदेशीर

**जवसचा** वापर रोजच्या आहारात करणे महत्त्वाचे आहे. भाकरीबरोबर जवस किंवा अळशीची चटणी हा मेनू खास ग्रामीण असला तरी जवसाचं महत्त्व सगळ्यांना कळायला लागलं आहे. जवसच्या नियमीत सेवनाने रक्तातील साखर, ट्रायग्लिसराईड्स, हिमोग्लोबिन आणि कोलेस्टेरॉल आटोक्यात राहू शकतात. स्त्रियांच्या बाबतीत हॉर्मोन्सची पातळी योग्य ठेवण्यासाठी जवसाचा उपयोग होतो.

- हिरड्या मजबूत करण्यासाठी आणि दात दुखत असल्यास त्यावर जवसचे तेल फायदेशीर ठरते.
- जवसाचं पीठ घेऊन त्याने छाती शेकली तर कफ पातळ होऊन तो बाहेर पडण्यास मदत होते. यामुळे तापाचे प्रमाण देखील कमी होईल.
- पाठ दुखत असेल तर दुखणाऱ्या जागी जवस बांधून ठेवावे.
- एखाद्या ठिकाणी भाजलं असेल तर त्या ठिकाणी जवसचं तेल आणि चुन्याची निवळी एकत्र करुन बांधावी. यामुळे जखम लवकर बरी होते.



आहारात जवसाचा वापर केल्यास भूक वाढते आणि पचनक्रिया देखील चांगली राहते.



# पाण्यात पाय बुडवून ठेवण्याचे फायदे

**मॉलमध्ये** किंवा मार्केटमध्ये फिरायला तर सर्वांना आवडतं, पण तिथून आल्यावर जो थकवा येतो त्याने अगदी काही काम नको नकोसं वाटतं. पण असा थकवा आपण काही वेळातच दूर करू शकता. त्यासाठी हे करा

- एका टबमध्ये कोमट पाण्यात थोडंसं मीठ घालून आपले दोन्ही पाय बुडवा. याने थकवा दूर होतो आणि चालताना सूज आली असल्यास त्यावरही राहत मिळते.
- ज्या लोकांना रात्री झोप न येण्याची तक्रार असते त्यांनी हा प्रयोग नक्की अमलात आणावा. झोपण्यापूर्वी कोमट पाण्यात १५ ते २० मिनिटे पाय बुडून ठेवावे.
- याने रक्तप्रवाह सुरळीत होतो.
- जे लोक रात्रभर एकाच कुशीवर झोपतात, त्याने सकाळी उठून हा प्रयोग करावा. याने दिवसभर फ्रेश जाणवेल.
- या प्रयोगाने किडनीची एनर्जी वाढते.
- संधिवाताची तक्रार असलेल्या लोकांनी पाण्यात दालचिनी आणि काळे मिरे टाकून पाय पाण्यात ठेवावे.
- हा प्रयोग जेवण झाल्यावर करणे योग्य ठरेल.
- लो ब्लड प्रेशरची तक्रार असलेल्यांनी गरम पाण्यात पाय ठेवून बसू नये. मधुमेही रुग्णांनी पण हा प्रयोग करू नये.

# टॅटू काढून टाकण्यापूर्वी या गोष्टींकडे अवश्य लक्ष द्या!

उत्साहाच्या भरात अनेकदा अंगावर वेगवेगळ्या ठिकाणी टॅटू काढले जातात. काहीजण आपल्या साथीदाराचे नाव टॅटूमध्ये बनवतात. पण कालांतराने नात्यात दुरावा आल्यानंतर तेच नाव नकोसे वाटते. अशावेळेस टॅटू काढून टाकण्यासाठी नेमके काय करावे? ही प्रक्रिया त्रासदायक असते का? याबाबतचा खास सल्ला डर्मेटोलॉजिस्ट डॉ. के. खतुजा यांनी दिला आहे.

**टॅटू क्रीम परिणामकारक नसतात**

टॅटू निघून जाण्यासाठी क्रीम्स किंवा बाम यांचा वापर करण फायदेशीर नाही. कोणत्याच घरगुती उपायांनी किंवा क्रीम लावल्याने टॅटूपासून सुटका मिळत नाही.

**लाल किंवा पिवळ्या रंगाचे टॅटू कायमचे जाणे कठीण आहे**


प्रत्येक रंग शोषून घेण्यासाठी काही विशिष्ट वेव्हलेंग्थ काम करतात. त्यामुळे एकाच वेव्हलेंग्थमुळे सारेच रंग जाणे कठीण असते. अनेकजण काळे आणि निळे घालवणारे लेझर वापरतात. त्याचाच वापर करून लाल किंवा पिवळा रंग जाणे मुश्कील आहे.

**लेझर त्रासदायक ठरत नाहीत**

लेझर ट्रीटमेंटपूर्वी त्वचेवर काही सोल्युशन लावून तेथील भागातील संवेदनशीलता कमी केली जाते. त्यामुळे काही सेकंद तुम्हाला त्रास जाणवतो. लेझर किरणांमुळे वातावरणातील उष्णता अधिक वाढते. म्हणूनच उपचारांदरम्यान आयवेअर दिली जातात. म्हणजे तुम्हाला काहीच दिसत नाही.

**हात, पाय, घोट्यावरील टॅटू काढणे कठीण आहे**

लोअर बॅकच्या भागापेक्षा बोटाच्या सांध्याजवळील टॅटू काढणे कठीण असते. शरीरात रक्तवाहिन्यांजवळील भागातील टॅटू काढणे अधिक सुकर आहे. पाय, घोटा किंवा हात या भागावरील टॅटू काढणे कठीण आहे.



**अनेक लेझर सेशन्स लागतात**

टॅटू पूर्णपणे काढून टाकण्यासाठी सुमारे १०-१५ सेशन्स लागतात. त्वचेला पुन्हा पूर्ववत होण्यासाठीदेखील वेळ द्यावा लागतो.

**टॅटूच्या खुणा राहतात**

टॅटू पूर्णपणे काढला तरीही त्याच्या थोड्याफार खुणा राहतात. टॅटू काढला तरीही तो कोणत्या भागावर होता हे तुमचे मित्र नक्कीच ओळखू शकतात.

**लेझर ट्रीटमेंटदरम्यान बर्निंग स्मेल येतो**

टॅटू काढताना तुम्हाला काही जाणवत नसले तरीही वास येतो. यादरम्यान त्वचेवर लेझरची किरणे जेव्हा त्वचेत जातात तेव्हा laser plume घटक वातावरणात मिसळल्यानंतर बर्निंग स्मेल येतो.

**काही काळ दुर्गंधीचा त्रास होईल**

स्कार/डाग पडू नये, त्वचा पूर्ववत व्हावी याकरिता काही जेलचा वापर करा. पण ॲन्स्थेशियाचा प्रभाव जसा कमी होतो तसा काही दिवस त्रास जाणवतो.

# चेहऱ्यावर पुन्हा त्याच जागी पिंपल का येतो?

**पिंपलचा** त्रास टाळण्यासाठी घरगुती उपाय, उत्तम फेसवॉश वापरणे यासारखे सारे खटाटोप करता. परंतु, अनेकांमध्ये विशिष्ट काळानंतर पुन्हा त्याच जागी पिंपल येण्याची समस्या आढळून येते. पिंपल्सचे चेहऱ्यावर त्याच त्याच जागी पुन्हा येणे यामागील नेमके काय याबद्दलचा खास सल्ला डर्मेटोलॉजिस्ट डॉ. सेजल शहा यांनी दिला आहे. त्वचेच्या खाली वाढणारे पिंपल्स अनेकदा त्वचेवर दिसत नाहीत. त्वचेवरील छिद्रांमधून जेव्हा तेल बाहेर पडण्याची प्रक्रिया वाढते तेव्हा सूजही वाढते. त्वचेच्या खाली तेलामुळे गोलाकार फुगवटा निर्माण होतो. त्याचे प्रमाण तेलावर अवलंबून असते. तसेच तुम्हाला सतत चेहऱ्याला हात लावण्याची सवय असेल तर पुन्हा त्याच जागी ॲक्ने वाढण्याचा धोका अधिक असतो. सतत चेहऱ्याला हात लावण्याच्या सवयीमुळे चेहऱ्यावरील मळ, तेल पुन्हा छिद्रांमध्ये ढकलला जातो. यामुळे पिंपल्सची वाढ अधिक प्रमाणात होते.

**पिंपलचा त्रास कमी करण्यासाठी काय कराल ?**

पिंपलमध्ये पस निर्माण झालेला असल्यास त्याला फोडण्याचा मोह टाळा. त्याला सतत हात लावू नका. ते आपोआपच कमी होण्यासाठी थोडा वेळ द्या. किंवा डर्मेटोलॉजिस्टचा सल्ला घ्या. अनेकदा पिंपल फोडल्यानंतरही त्यातील सारा पांढरा भाग/पस बाहेर पडत नाही. त्यामुळे पुन्हा त्याजागी पिंपल वाढण्याची शक्यता निर्माण होते. म्हणूनच चेहरा पूर्णपणे स्वच्छ करण्यासाठी salicylic acid युक्त फेसवॉशचा वापर करा. यामुळे अतिरिक्त तेल काढण्यास मदत होते. benzoyl peroxide चा समावेश असलेल्या उत्पादनांची निवड केल्यास त्वचेवर वाढणारे आणि ॲक्नेच्या निर्मितीला कारणीभूत ठरणाऱ्या बॅक्टेरियांचा प्रभाव कमी करण्यास मदत होते.



# चमकदार दातांसाठी झोपण्याच्या वेळेस करा ही कामे

- नारळाचे तेल ऑरगॅनिक आणि नॅच्युरल टीथ व्हाईटनर आहे. नारळाच्या तेलाने तुम्ही तुमचे दात चमकवू शकता. यासाठी थोडेसे नारळाचे तेल घेऊन १५ मिनिटे तोंडात ठेवा. त्यानंतर साध्या पाण्याने चूळ भरा. यामुळे फायदा होईल.
- दात चमकवण्यासाठी सोपा उपाय म्हणजे स्ट्रॉबेरीज. स्ट्रॉबेरीच्या गरात चिमूटभर बेकिंग सोडा मिसळा. हे मिश्रण ब्रशवर घेऊन दात घासा. यामुळे दातांवरील पिवळेपणा दूर होईल.
- ॲपल सिडर व्हिनेगरही दात चमकावण्यात महत्त्वाची भूमिका बजावते. याचे काही थेंब दातांवर चोळा. अधिक फायद्यासाठी सकाळी ब्रश करण्याआधी या व्हिनेगरने दात चोळा.



# किरकोळ आजारांकडे दुर्लक्ष नको

आपल्या दैनंदिन जीवनमानात अगदी किरकोळ आजार हे कधीकधी दुर्लक्षिले जातात, मात्र त्याचा त्रास जाणवू लागला की त्यानंतर डॉक्टरकडे धाव घेतली जाते. मात्र अगदी किरकोळ वाटणारे दुखणे हे एखाद्या आजाराचे कारण आहे असे समजले की मग मनात भीती निर्माण होते. शिवाय त्या आजाराचे गंभीर परिणाम आयुष्याची चिंता, खर्च आदी गोष्टींचे टेन्शन निर्माण होऊन मग वेळीच इलाज केला असता, तर बरे झाले असते असे वाटून जाते. यावेळी अगदी किरकोळ म्हणून वाटणारे दुखणे हे एखाद्या गंभीर आजाराचे लक्षण आहे, असे वाटले तर त्यावर वेळीच इलाजही केला जाऊ शकतो.

**पित्त :** आपल्याला नियमित काही खाल्ले तर त्याचा त्रास होतो. खाल्लेले पचत नाही, किंवा भूकच लागत नाही. छातीत जळजळ, तेलकट किंवा दुपारच्या जेवणाव्यतिरिक्तही काही खाल्ले तरी ते पचत नाही, म्हणून मग ते किरकोळ पित्तावर ढकलले जाते. पण मग त्याचा अति त्रास झाला की, मग डॉक्टरकडे जाण्यावाचून पर्याय उरत नाही. पित्तामुळे काही खाणे होत नाही. यामुळे एकप्रकारची त्रस्तता दिसून येते. मात्र यावर वेळीच इलाज न केल्यास याचा परिणाम पित्ताचे खडे होणे आदीसारख्या समस्या निर्माण होण्याकडे दिसून येतो. मग पित्ताचे खडे काढण्यासाठी ऑपरेशन केली जातात.



**पोटदुखी :** पोटदुखीसारख्या वारंवार उद्‌भवणाऱ्या आजाराकडे बरेचदा दुर्लक्ष केले जाते. काही घरगुती उपाय करून किंवा अशा दुखण्यांकडे दुर्लक्ष करून ती किरकोळ म्हणून त्याकडे दुर्लक्ष केले जाते. मात्र मासिक पाळीच्या वेळी पोटात दुखणे, किंवा इतरवेळी वारंवार पोटात दुखणे हे नेहमीचेच म्हणूनही त्याकडे फारसे लक्ष दिले जात नाही. एका उदाहरणामध्ये एका महिलेच्या वारंवार पोटात दुखण्याच्या तक्रारीमुळे काही घरगुती इलाज केल्यानंतरही काही गुण नाही म्हणून मग डॉक्टरी उपाय करण्याचे ठरले. स्टोनमुळे पोटात दुखत असावे असा अंदाज करून डॉक्टरनेही त्यावरील औषधे सुरू केली. काही पथ्ये सांगून औषधांना खर्चदेखील झाला. मात्र, तरीदेखील हे दुखणे सुरूच राहिल्याने शेवटी तज्ज्ञांकडून तपासणी केली असता, गंभीर आजाराचे निदान झाले आणि हेच वारंवार दुर्लक्षिले गेलेले दुखणे आयुष्याची चिंता भेडसावणारे ठरले.

**डोकेदुखी :** अगदी कोवळ्या वयाची मुले आपले डोके दुखते म्हणून अगदी डोके धरून बसतात. यावेळी लहान मुलांना चष्मा लागणे स्वाभाविक आहे म्हणून त्यांना चष्मा असावा असा अंदाज करून डोकेदुखीच्या आजाराकडे बरेचदा दुर्लक्ष केले जाते. शालेय जीवनात अशा तक्रारी वारंवार उद्‌भवताना दिसून येतात. चक्कर येणे, डोके दुखणे अशा आजाराकडे दुर्लक्ष करण्यापेक्षा लहान मुलांची काळजी घेणे आवश्यक आहे.

# महापालिकेच्या मलनिःसारण विभागात बनावट दस्तावेज घोटाळा?



महापालिकेच्या माजीवाडा-मानपाडा, वर्तक नगर, वागळे, कळवा, दिवा आणि मुंब्रा भागांमध्ये नाले बांधकामासाठी निविदा काढण्यात आल्या होत्या. या प्रक्रियेत सहभाग घेतलेल्या फोर्स कन्स्ट्रक्शन या ठेकेदाराने बनावट कागदपत्रे सादर केली आहे. विशेष म्हणजे, महापालिकेच्या अधिकाऱ्यांना याची कल्पना असूनही कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही.

**■ठाणे :** ठाणे महापालिकेच्या मलनिस्सारण विभागातील एका उपअभियंत्याच्या लेटर बॉम्बमुळे बांधकाम व्यवसायिकांना नालेबांधणीच्या परवानग्यांचा घोटाळा समोर आला असतानाच, त्यापाठोपाठ आता १७५ कोटींच्या नाले बांधकामाच्या निविदांमध्ये घोटाळा झाल्याचा गंभीर आरोप मनसेने केला आहे. याप्रकरणाची चौकशी करून संबंधितांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणीचे पत्र मनसेने पालिका आयुक्तांकडे दिल्याने मलनि:सारण विभागातील अधिकारी चौकशीच्या फेऱ्यात सापडण्याची चिन्हे निर्माण झाली आहेत. दरम्यान, ठाणे महापालिकेच्या मलनिस्सारण विभागाचे कार्यकारी अभियंता एम. एल. वाड यांच्याशी संपर्क साधला. मात्र, त्यांची प्रतिक्रिया मिळू शकली नाही. ठाणे महापालिकेने सप्टेंबर आणि ऑक्टोबर महिन्यात मूलभूत सुविधांच्या विकास योजनेअंतर्गत सुमारे १७५ कोटी रुपयांच्या नाले बांधकामासाठी निविदा काढल्या होत्या.

शासनाच्या निधीतून होणाऱ्या या कामासाठी निविदा प्रक्रिया राबवून ठेकेदारांची नियुक्ती करण्यात आली. मात्र, निविदा प्रक्रियेत पारदर्शकता न राखता ठेकेदारांनी बनावट दस्तावेज सादर करून महापालिकेची मोठ्या प्रमाणावर फसवणूक केली आहे, असा गंभीर आरोप महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जनहित व विधी विभागाचे ठाणे शहर अध्यक्ष स्वप्नील महिंद्रकर यांनी केला आहे.

उलट या ठेकेदाराला इतर मोठी कामे मिळवून देण्यात आली असल्याचा आरोप महिंद्रकर यांनी केला आहे. दरम्यान गेल्या पाच वर्षांपासून हा ठेकेदार ठाणे महापालिकेत बनावट कागदपत्रांच्या आधारे करोडो रुपयांची कामे मिळवत आहे. इतर ठेकेदारांशी संगनमत करून महापालिकेची फसवणूक करण्याचे प्रकार सुरू असून, महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी ठेकेदाराच्या कागदपत्रांची योग्य पडताळणी न केल्यामुळे कोट्यवधी रुपयांचे नुकसान होत आहे, असा आरोपही त्यांनी केला आहे. या ठेकेदारासह त्याला मदत करणाऱ्या महापालिका अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हा दाखल करावा तसेच संबंधित ठेकेदाराला काळ्या यादीत टाकून त्याने गेल्या दहा वर्षांत महापालिकेत केलेल्या सर्व कामांची चौकशी करण्यात यावी, अशी मागणी महापालिका आयुक्तांकडे केल्याचे त्यांनी सांगितले.

# शहाड भागातील वाहतुकीला अडथळा ठरणाऱ्या बेकायदा निवाऱ्यांवर कारवाई





**■ठाणे :** कल्याण जवळील शहाड भागात अनेक व्यावसायिकांनी रस्ते, पदपथ अडवून निवारे उभे करून तेथे व्यवसाय सुरू केले होते. देढिया महाविद्यालयासमोरील रस्ते, पदपथांवर फेरीवाल्यांनी अतिक्रमण करून तेथे प्लास्टिक, बांबूचे निवारे उभे केले होते. या निवाऱ्यांमुळे या भागातील नागरिकांना, वाहन चालकांना अडथळे येत होते. या बेकायदा निवाऱ्यांच्या तक्रारी प्राप्त होताच अ प्रभागाचे साहाय्यक आयुक्त प्रमोद पाटील यांनी अतिक्रमण नियंत्रण, फेरीवाला हटाव पथकासह जाऊन हे सर्व निवारे जमीनदोस्त केले. पदपथ, रस्त्यांच्या आडोशाने तात्पुरते निवारे उभे करून तेथे पक्की बांधकामे करण्याची तयारी फेरीवाले, व्यावसायिकांनी सुरू केली होती, असे तोडकाम पथकाच्या निदर्शनास आले. हे निवारे तोडल्यानंतर या भागात पुन्हा रस्ते, पदपथ अडवून निवारे उभे केले तर फौजदारी कारवाई केली जाईल, अशी तंबी साहाय्यक आयुक्त प्रमोद पाटील यांनी येथील व्यावसायिकांना दिली आहे.शहाड परिसरात नवीन गृहसंकुले उभी राहत आहेत. महाविद्यालय, शाळा या भागात आहेत. बिर्ला महाविद्यालयाकडे जाणारे बहुतांशी विद्यार्थी शहाड रेल्वे स्थानकातून येजा करतात. याशिवाय या भागात बाजारपेठा आहेत. बाजारपेठांमध्ये सकाळ, संध्याकाळ गर्दी असते. अशा परिस्थितीत शहाड, देढिया महाविद्यालय भागातील मुख्य वर्दळीचे रस्ते, पदपथ अडवून व्यावसायिकांनी बेकायदा निवारे उभे केले होते.

### टिटवाळ्यात कारवाई

टिटवाळ्यात बाजपेयी चौकात एका शाळेच्या बाजुला एका दुकानदाराने दुकानाचा बेकायदा गाळा उभारणीचे काम सुरू केले होते. हे बांधकाम आडबाजुला असल्याने तेथे कारवाई होणार नाही असे दुकानदाराला वाटले होते. याविषयीच्या तक्रारी प्राप्त होताच अ प्रभागाच्या तोडकाम पथकाने हे निमार्णाधिन बांधकाम जमीनदोस्त. गाळेगाव येथे बेकायदा चाळ उभारणीसाठी जोत्यांचे बांधकाम केले जात होते. ही बांधकामेही यावेळी तोडण्यात आली. साहाय्यक आयुक्त प्रमोद पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली अधीक्षक शशांक गर्ग, अतिक्रमण नियंत्रण पथकाचे राजेंद्र साळुंखे आणि इतर कर्मचारी या कारवाईत सहभागी झाले होते.

# माझी वसुंधरा अभियानाच्या माध्यमातून नावझे गावाचा पर्यावरण रक्षणाचा संकल्प

**■ठाणे :** माझी वसुंधरा अभियान ५.० च्या माध्यमातून पालघर तालुक्याच्या नावझे या गावातील नागरीकांनी पर्यावरण संरक्षणासाठी वर्षभरात विविध उपक्रम राबवत ग्रामपंचायत आणि लोकसहभाग यांच्या माध्यमातून संपूर्ण गावाचा कायापालट करण्याचे दृष्टीने प्रयत्न सुरु केले आहेत.

नैसर्गिक परीसंस्थांचे जतन व संवर्धन करण्यासाठी विविध उपाययोजनांची अंमलबजावणी आणि वातावरणीय बदलाच्या अनुषंगाने पर्यावरणपूरक उपक्रम राबविण्याबाबत नागरिकांना प्रोत्साहित करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल या विभागामार्फत एक जून २०२४ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीमध्ये माझी वसुंधरा अभियान ५.० या अभियानाची राज्याच्या नागरी आणि ग्रामीण भागात अंमलबजावणी सुरु आहे.

पालघर तालुक्यातील नावझे या दोन हजार लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतीने माझी वसुंधरा अभियान ५.० मध्ये आपला सहभाग नोंदवून ग्रामस्थांच्या प्रत्यक्ष सहभागाने वर्षभरात विविध उपक्रम राबविण्याचे कार्य सुरु आहे. पृथ्वी, वायू, जल, अग्नी आणि आकाश या पंचमहाभूतांवर आधारीत पर्यावरणाच्या संरक्षणासाठी ग्रामपंचायत नावझे यांच्या माध्यमातून सुरु असलेल्या उपक्रमांमध्ये गावातील सर्व ग्रामस्थ आणि शालेय विद्यार्थी उत्साहाने




सहभाग घेत आहेत.

नागरीक आणि विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संरक्षणाची भावना निर्माण व्हावी याकरिता तज्ञ मार्गदर्शकांद्वारे जनजागृती उपक्रमासोबतच प्रत्यक्ष कृती करण्यावर भर दिला जात आहे.

माझी वसुंधरा अभियान ५.० या अभियानांतर्गत वर्षभरात नावझे ग्रामपंचायतीच्या माध्यमातून ग्रामस्थ आणि विद्यार्थी यांच्या प्रत्यक्ष सहभागाद्वारे गावात स्वच्छता, घनकचरा आणि ई कचरा व्यवस्थापन, कृषी कचरा व्यवस्थापन, तृणधान्य वापरास प्रोत्साहन, वृक्षारोपण व संवर्धन, औषधी वनस्पतींची लागवड, जास्तीत जास्त सौर उर्जा वापर, एकल वापर प्लास्टिक बंदी, कापडी पिशवी वापराचे महत्व, आपत्ती व्यवस्थापन, पावसाचे पाणी साठवणूक प्रणाली, बांबू, शेवगा आणि वाळा लागवडीस प्रोत्साहन, फटाके बंदी, बायोगस, शोषखड्डे, बीज संकलन, गांडूळ खत प्रकल्प, सण-उत्सवांच्या वेळी होणारे जल व ध्वनी प्रदूषण कमी करणे, इलेक्ट्रिक वाहनांसाठी चार्जिंग स्टेशन, टाकाऊ वस्तूपासून टिकाऊ वस्तू तयार करणे, ग्रामपंचायत, शाळा, अंगणवाडी, दवाखाना आणि देवस्थान परिसराचे सुशोभीकरण आणि शांतता क्षेत्र घोषित करणे आदी अनेक उपक्रम सुरु करण्यात आले आहेत.

ग्रामपंचायत नावझे येथे माझी वसुंधरा अभियान ५.० राबविताना भूमी, वायू, जल, आकाश, अग्नी या पाच तत्वांवर गावाच्या पर्यावरण रक्षणासाठी काम करण्यात आले.

> "ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच, सर्व सदस्य, विद्यार्थी, तरुण मंडळ, महिला बचत गट, ग्रामस्थ , कर्मचारी सर्वांच्या सहकार्यानें प्रत्यक्ष कृती आणि जनजागृती उपक्रम प्रभावीनावर भर दिला."
>
> **-मानसी मयूर लाटे, ग्रामपंचायत अधिकारी नावझे**

# ठाकुर्लीतील ९० फुटी रस्त्यावरील विजेच्या लपंडावाने नागरिक हैराण



**■कल्याण :** मागील तीन दिवसांपासून ठाकुर्लीतील ९० फुटी रस्ता परिसरात महावितरणच्या विजेचा लपंडाव सुरू आहे. अनेक वेळा पाच ते सहा तास या भागातील वीज पुरवठा बंद असतो. वीज पुरवठा का बंद आहे, यासाठी महावितरण कार्यालयात संपर्क केला तर तेथील संपर्क क्रमांक सतत व्यस्त असतो, अशा तक्रारी या भागातील नागरिकांनी केल्या आहेत. डोंबिवली जवळील ठाकुर्लीतील ९० फुटी, खंबाळपाडा, कांचनगाव, ठाकुर्ली हा नवीन गृहसंकुलांनी विकसित झालेला भाग आहे. बहुतांशी मध्यवर्ग या भागात राहतो. महावितरणला या वीज देयकाच्या माध्यमातून चांगला महसूल या भागातून मिळतो. कल्याण डोंबिवली पालिकेच्या हद्दीतील हा भाग ग्रामीण भागात येत नाही. तरीही ९० फुटी रस्ता परिसराचा वीज पुरवठा विविध कारणांनी बंद असतो. या विजेच्या वाढत्या लपंडावामुळे नागरिक हैराण आहेत. कडक उन्हाळ्याचे दिवस सुरू आहेत. घरात बसुनही अंगाची लाही लाही होत आहे. अशा परिस्थितीत वीज पुरवठा बंद झाल्यानंतर घरातील पंखा, वातानुकूलित यंत्रणा, शीतकपाट बंद राहते. या कालावधीत घरात राहणे असह्य होते. रात्रीच्या वेळेत वीज पुरवठा बंद झाल्यानंतर अनेक नागरिक घराबाहेर गारव्यासाठी बाहेर पडतात. बाहेर डासांचा हल्ला होतो, अशा तक्रारी नागरिकांनी केल्या.

# शिळफाटा रस्त्यालगत महावितरणच्या विजेच्या खांबांचा वाहतुकीला अडथळा

**■कल्याण :** कल्याण शिळफाटा रस्त्यालगत दुतर्फा महावितरणच्या विजेचे खांब, भूमिगत वीज वाहिन्यांचे जाळे आहे. हे विजेचे खांब, जागोजागी असलेल्या भूमिगत वीज वाहिन्यांच्या तारांचा वेट्टोळे अलीकडे शिळफाटा रस्त्यावरील वाहनांना अडथळा ठरत आहेत. या वीज वाहिन्यांच्या वेट्टोळया तारांमुळे अनेक ठिकाणी पदपथ अडविले गेले आहेत. त्यामुळे पादचाऱ्यांना या रस्त्यावरून चालताना कसरत करावी लागते. या रस्त्यावरील विजेचे खांब महावितरणने हटवावेत, अशी वाहतूक विभागाची मागणी आहे.

गेल्या आठवड्यात मेट्रोच्या ठेकेदाराने रात्रीच्या वेळेत शिळफाटा मानपाडा चौकात संरक्षित पत्रे उभे करून वाहतुकीला अडथळा आणला होता. या अडथळ्यांमुळे शिळफाटा रस्ता पहाटेपासून दिवसभर कोंडीत अडकला होता. ही कोंडी सोडविण्यासाठी आलेल्या



> "शिळफाटा रस्त्यालगतचे विजेचे खांब स्थलांतरित करण्याची जबाबदारी एमएमआरडीएच्या विद्युत विभागाची आहे. या कामासाठी महावितरणने आवश्यक मंजुऱ्या प्राधिकरणाला दिल्या आहे. ठेकेदार नियुक्त करणे, देखरेख शुल्क महावितरणकडे भरण्याची जबाबदारी प्राधिकरणाची आहे. वीज खांब स्थलांतरणाचे काम महावितरणच्या देखरेखीखाली होईल. या कामासाठी महावितरण प्राधिकरणाकडे पाठपुरावा करत आहे."
>
> **-दीपक पाटील, अधीक्षक अभियंता, महावितरण.**

वाहतूक विभागाचे पोलीस उपायुक्त पंकज शिरसाट यांनी माध्यमांना सांगितले होते, शिळफाटा रस्त्यावरील कोंडीला शिळफाटा रस्त्यालगत महावितरणचे विजेचे खांब जबाबदार आहेत. हे खांब स्थलांतरित करावेत म्हणून वाहतूक विभागाने महावितरणला अनेक वेळा पत्रे दिली आहेत. त्यांना संपर्क करून कळवले आहे. हे खांब स्थलांतरित करण्यासाठी महावितरणला रस्त्यालगत पर्यायी जागा उपलब्ध करून दिली आहे. तरीही महावितरणचे अधिकारी आमच्याकडे निधी उपलब्ध नाही, अशी साचेबध्द उत्तरे देतात, असे सांगितले होते.

शिळफाटा रस्त्यावरील वाहनांची संख्या वाढल्याने रस्त्यालगत असलेले महावितरणचे विजेचे खांब स्थलांतरित होणे गरजेचे आहे, अशी प्रवाशांचीही मागणी आहे. महावितरणकडून त्याची दखल घेण्यात येत नसल्याने वाहतूक विभागाच्या अधिकाऱ्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली होती. शिळफाटा रस्त्यावर मेट्रोची कामे गेल्या वर्षापासून सुरू करण्यात आली आहेत. या कामांमुळे शिळफाटा रस्त्याच्या मध्यभागी संरक्षित पत्रे बसविण्यात आले आहेत. रस्त्याची मार्गिका दोन्ही बाजुने अरूंद झाली आहे. या अरूंद जागेत दररोज वाहन कोंडी होत आहे. या कोंडीमुळे वाहन चालक रस्ता सीमारेषा भागातून वाहने चालवितात. या वाहनांना विजेचे खांब अडसर येऊ लागले आहेत.

महावितरणच्या अधिकाऱ्यांनी सांगितले, शिळफाटा रस्त्यावरील १० किमी पट्ट्यातील मेट्रो आणि इतर कामांमुळे वाहतुकीला अडथळा ठरणारे विजेचे खांब स्थलांतरित करण्याची जबाबदारी एमएमआरडीएची आहे. हे खांब स्थलांतरित करण्यासाठी एमएमआरडीएने दिलेला प्रस्ताव एप्रिल २०२४ मध्ये १.३ टक्के खांब स्थलांतरित (डीडीएफ) योजनेतून मंजूर करून अंतीम कार्यवाहीसाठी एमएमआरडीएला देण्यात आला आहे. या प्रक्रियांसाठी एमएमआरडीएने कंत्राटदाराची नियुक्ती करणे आवश्यक आहे. या कामाच्या अंदाजपत्रकाला महावितरणने मे २०२४ मध्ये मंजुरी दिली आहे. प्राधिकरणाने या कामासाठी अद्याप ठेकेदार नियुक्त केला नाही आणि देखरेख शुल्क महावितरणकडे भरणा केलेले नाही, असे महावितरणच्या अधिकाऱ्याने सांगितले.

# जादा परतावा आणि जमीनीच्या योजनेच्या नावाखाली सुमारे १०० जणांची कोट्यवधींना फसवणूक

**■ठाणे :** जादा परतावा आणि गुंतवणूकीच्या मोबदल्यात जमीनी मिळवून देतो असे सांगून काही भामट्यांनी सुमारे १०० जणांची कोट्यवधी रुपयांना फसवणूक केल्याचा प्रकार उघड झाला आहे. याप्रकरणी ठाणेनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून याप्रकरणाचा तपास ठाणे आर्थिक गुन्हे अन्वेषण शाखेकडून सुरू आहे.

फसवणूक झालेले गुंतवणूवणूकदार ठाणे जिल्ह्यातील आहेत. ठाणे शहरातील बाजारपेठ परिसरात दोन कंपन्या थाटण्यात आल्या होत्या. २०१५ ते २०१९ या कालावधीत या कंपन्यांमध्ये ठेवींच्या बदल्यात चांगला परतावा मिळणार असल्याचे सांगण्यात आले होते.

पाच वर्षांमध्ये ६९ हजार रुपये भरल्यास एक लाख रुपयांचा मोबदला, तीन वर्षांमध्ये एकूण ३९ हजार ६०० रुपये भरल्यास ५० हजार रुपयांचा मोबदला अशा वेगवेगळ्या योजना यामध्ये होत्या. तर दुसऱ्या कंपनीच्या योजनेत एक लाख रुपये भरल्यास दरमहा दीड हजार रुपये आणि तीन वषानंतर मुद्दल पुन्हा मिळणार तसेच गुंतवणूकीच्या मोबदल्यात ६६६ चौ. फूट जागा, एकदाच पाच




हजार रुपये भरल्यास सात वर्षांनी पाचपट म्हणजेच, २५ हजार रुपये आणि गुंतवणूकीच्या मोबदल्यास ३३ चौ. फूट जागा अशा विविध योजना गुंतवणूकदारांना देण्यात येत होत्या. त्यामुळे ९६ गुतंवकणूकदारांनी या कंपन्यांत दीड कोटीहून अधिक रुपयांची गुंतवणूक केली होती. या कंपन्यांनी गुंतवणूकदारांनाच एजंट केले होते. त्यामुळे अनेकांनी यात गुंतवणूक केली होती.

परंतु काही गुतंवणूकदारांना त्यांच्या रकमेचा परतावा मिळत नव्हता. काही गुंतवणूकदारांनी कंपन्यांच्या अधिकाऱ्यांची भेट घेऊन याबाबत विचारणा केली. परंतु त्यांना आश्वासने दिली जात होती. काही दिवसांनी कंपन्यांचे अधिकारी कंपनीला टाळे ठोकून निघून गेले. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर सोमवारी गुंतवणूकदारांनी याप्रकरणी ठाणेनगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. या तक्रारीच्या आधारे हे प्रकरणी आर्थिक गुन्हे अन्वेषण शाखेकडे वर्ग करण्यात आला आहे.

# कल्याण वाहतूक विभागातील वाहतूक सेवक २ हजाराची लाच स्वीकारताना अटक

**■कल्याण :** गेल्या महिन्यापूर्वी कल्याण वाहतूक विभागातील प्रवीण गोपाळे हे वाहतूक पोलीस एका माल वाहतूकदार व्यावसायिकाकडून पाचशे रूपयांची लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या सापळ्यात अडकले होते. ही ताजी घटना असताना बुधवारी सकाळी कल्याण वाहतूक शाखेतील वाहतूक सेवक (वॉर्डन) एका वाहन चालकाकडून दोन हजार रूपयांची लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळ्यात सापडला. या सततच्या प्रकरणांमुळे कल्याण वाहतूक शाखेतील वाहतूक पोलीस रस्त्यावर वाहतूक नियोजनासाठी उभे असतात की लाचखोरीसाठी उभे असतात असे प्रश्न वाहन मालक, चालकांकडून उपस्थित केले जात आहेत. वैभव युवराज शिरसाट (२६) असे लाच स्वीकारताना सापडलेल्या वाहतूक सेवकाचे नाव आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस निरीक्षक राजेश जागडे यांच्या पथकाने ही अटकेची कारवाई केली. महात्मा फुले पोलीस ठाण्यात याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महात्मा फुले पोलीस ठाण्यातील तक्रारीत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्याने म्हटले आहे, की कल्याण रेल्वे स्थानक भागात एका वाहन चालकाने नियमबाह्य पध्दतीने आपली दुचाकी उभी केली होती. ही दुचाकी वाहतूक विभागाने कल्याण वाहतूक शाखेत जमा केली होती. ही दुचाकी सोडविण्यासाठी दुचाकी वाहन मालकाकडे वाहतूक पोलीस यांनी वाहन मालकाकडे तीन हजार रूपयांची मागणी केली होती. तडजोडीअंती ही रक्कम दोन हजार रुपए देण्याचे ठरले होते. याप्रकरणी वाहन मालकाने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या संपर्क पडताळणीत वाहतूक पोलीस लाच मागत असल्याचे निष्पन्न झाले होते. बुधवारी सकाळी दुचाकी वाहन मालक वाहतूक शाखेत आपले वाहन सोडविण्यासाठी आला होता. त्यावेळी वाहतूक सेवक वैभव शिरसाट यांनी तडजोडीअंती तीन हजार रूपयांऐवजी दोन हजार रुपये स्वीकारण्याचे कबुल करून कल्याण शहर वाहतूक शाखेच्या बाहेरील सार्वजनिक रस्त्यावर वाहन मालकांकडून दोन हजार रुपये जमा वाहन सोडविण्यासाठी स्वीकारले. त्याचवेळी सापळा लावून बसलेल्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने वैभव शिरसाट यांना लाच स्वीकारताना रंगेहाथ पकडले. त्यांना पोलिसांनी चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे. याप्रकरणात अन्य कोणाचा सहभाग आहे का याचा तपास पथकाने सुरू केला आहे. दरम्यान, वाहतूक सेवकांना दरमहा पाच हजार रुपए मानधन आहे. हे मानधन पाच ते सहा महिने मिळत नाही. ते वाढवुनही मिळत नाही. त्यामुळे वाहतूक सेवक वाहन मालकांकडून चिरीमिरी घेत असल्याची माहिती आहे. पालिकेकडून वाहतूक सेवकांना दरमहाचे मानधन दिले जाते. हे मानधन अनेक वर्षांपासून वाढविण्यात आलेले नाही आणि ते वेळेवर मिळत नाही, अशा वाहतूक सेवकांच्या तक्रारी आहेत.

# मुलं खिडकीत खेळत होती, अन् काळजाचा ठोका चुकवणारी घटना घडली

**■उल्हासनगर :** तुमची लहान मुलं सुद्धा घरातल्या खिडकीतल्या जाळ्यांमध्ये खेळण्यासाठी बसतात का. तर ही बातमी तुमच्यासाठी महत्वाची आहे. कारण उल्हासनगर शहरात एका इमारतीत खिडकीच्या जाळीत बसून खेळणारी दोन लहान मुले जाळी तुटल्याने थेट खाली कोसळली आहेत. दुसऱ्या मजल्यावरून कोसळल्याची ही काळजाचा ठोका चुकवणारी घटना उल्हासनगरच्या कॅम्प पाचमध्ये समोर आली. यात दोन्ही मुलांना दुखापत झाली आहे. सध्या दोघांची प्रकृती स्थिर आहे.

अत्यंत दाटीवाटीचे शहर म्हणून उल्हासनगर शहर ओळखले जाते. जगातल्या सर्वात कमी चौरस फुटात अधिक लोकसंख्या वास्तव्यास असलेल्या शहरात उल्हासनगर शहराचा अग्रक्रम लागतो. त्यामुळे येथे मोकळ्या जागांचाही अभाव आहे. त्यामुळे लहानग्यांना घरातच खेळण्यावाचून पर्याय



नाही. मात्र याच शहराच धोकादायक इमाारतींचा प्रश्नही तितका गंभीर आहे. उल्हासनगरच्या कॅम्प पाच भागात अशाच प्रकारची एक घटना समोर आली आहे. कॅम्प पाच भागातील गांधी चौक परिसरात हरे राम-हरे कृष्णा ही इमारत आहे.

सोमवारी सायंकाळच्या सुमारास यातील दुसऱ्या जमल्यावर एका घरात सहा वर्षांचा मुलगा आणि चार वर्षांची मुलगी खिडकीत खेळत होते. खेळत असताना ते दोघेही घराच्या जाळीत बसले. खेळत असताना अचानक ही लोखंडी जाळी तुटली आणि सर्वांच्या काळजाचा ठोका चुकला. जाळी तुटल्याने दोघे लहान मुले थेट दुसऱ्या मजल्यावर खाली कोसळली.

या घटनेने संपूर्ण परिसरात एकच खळबळ उडाली. दोन्ही मुले कोसळल्याने त्या दोघांना दुखापत झाली आहे. त्यांच्यावर खासगी रूग्णालयात उपचार करण्यात आले. दोघांची प्रकृती आता स्थीर आहे. पण या घटनेमुळे घरांच्या खिडक्यांच्या मजबुतीचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

अनेकदा घरांतील अशा जाळ्यांकडे लक्ष जात नाही. त्या जाळ्यांना बसवल्यानंतर वषार्नुवर्षे लक्ष दिले जात नाही. त्यामुळेच अशा घटना घडत असल्याचे बोलले जाते. त्यामुळे नागरिकांनी आपल्या मुलांच्या खेळण्यासोबतच घरातील अशा लोखंडी खिडकी जाळ्यांच्या सुरक्षेची काळजी घेण्याचे आवाहन केले जाते आहे.

# उल्हासनगरात बांगलादेशी महिलेला अटक

**■उल्हासनगर :** कोणत्याही अधिकृत दस्तऐवजांशिवाय भारतात प्रवेश करून उल्हासनगर शहरात घरकाम करणाऱ्या एका बांगलादेशी महिलेला उल्हासनगर पोलिसांनी अटक केली आहे उल्हास नगरातील कॅम्प तीन भागात अमिना खातून हरुन गाझी उर्फ रेक्सोना उर्फ पूजा (३४) हिला अटक करण्यात आली आहे. गेल्या काही महिन्यात बेकायदेशीर रित्या देशात राहणाऱ्या बांगलादेशी नागरिकांना पकडून अटक केली जाते आहे. उल्हासनगर शहर आणि आसपासच्या भागात अशा अनेक बांगलादेशी व्यक्तींवर गेल्या काही दिवसात कारवाई करण्यात आली आहे. उल्हासनगर पोलिसांनी शहर आणि ग्रामीण भागातही बांगलादेशी व्यक्तींना पकडण्यासाठी कारवाई केली होती. उल्हासनगरच्या हिल लाईन पोलीस ठाण्यात याबाबतच्या विविध घटना आहेत बांगलादेशी नागरिक ग्रामीण भागात चाळींमध्ये वास्तव्यास असल्याचे अशा कारवायांमध्ये दिसून आले होते. स्थानिक पातळीवर मोलमजुरी ची कामे करून हे बांगलादेशी नागरिक अनधिकृतपणे वास्तव्य करतात. परिमंडळ चर्चा पोलिसांनी अशा बांगलादेशी नागरिकांना पकडण्यासाठी गेल्या काही महिन्यात मोठी शोध मोहीम राबवली आहे. यात त्यांना मोठे यश मिळाले आहे. उल्हासनगरच्या मध्यवर्ती पोलिसांनी अशीच एक कारवाई करत एका महिलेला अटक केली आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई 400063 (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com